cmyk

## संपादकीय

### वारशाची जबाबदारी अन् नेतृत्वाची खरी कसोटी

राजकारणातील वारसा, सहानुभूतीची लाट आणि संघटनात्मक वास्तव यांचा संगम जेव्हा एखाद्या नेत्यासमोर उभा राहतो, तेव्हा त्या नेतृत्वाची खरी कसोटी सुरू होते. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवार यांनी सूत्रे स्वीकारल्यानंतर नेमकी हीच कसोटी त्यांच्या वाट्याला आली आहे. उपमुख्यमंत्रिपदाच्या जबाबदारीनंतर पक्षाचे सर्वोच्च नेतृत्व त्यांच्या हाती देण्याचा निर्णय अनेकांना अपेक्षित वाटत असला, तरी त्यामागील राजकीय आणि संघटनात्मक गुंतागुंत तितकीच गंभीर आहे.

दैनिक www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र वर्ष–५ अंक–३०४ रविवार दि.०१ मार्च २०२६ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### नोटा घेऊन जाणारे विमान कोसळले;१५ ठार

बोलिव्हिया: बोलिव्हियाच्या राजधानीजवळ शुक्रवारी पैसे घेऊन जाणारे एक मालवाहू विमान कोसळले. त्यामुळे महामार्गावरील सुमारे १२ वाहनांचे नुकसान झाले. विमान कोसळल्यानंतर नोटा जमिनीवर विखुरल्या गेल्या होत्या. या अपघातात १५जणांचा मृत्यू झाला. यात अनेकजण जखमी झाले आहेत.पंधरा जणांचा मृत्यू 'रॉयटर्स'च्या वृत्तानुसार, शुक्रवारी संध्याकाळी बोलिव्हियाची राजधानी ला पाझजवळील एल अल्टो शहरात खराब हवामानामुळे एक विमान कोसळले.यात किमान ३० जण जखमी झाले आहेत.

### पाकिस्तानला कायम 'बळ' देणारा –चीन

नवीदिल्ली : अमेरिका आणि इस्रायलने संयुक्त कारवाई करत इराणवर भीषण एअरस्ट्राईक केले आहेत. राजधानी तेहरानसह ३० ठिकाणांवर हल्ले करण्यात आलेलष्करी मैदानात न उतरता चीन इराणला जागतिक राजकारणाच्या पटावर भक्कम संरक्षण पुरवत आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत चीन नेहमीच इराणच्या पाठीशी उभा राहतो आंतरराष्ट्रीय कायदा आणि इराणच्या सार्वभौमत्वाचा दाखला देत, चीनने इराणला जागतिक स्तरावर एक 'कायदेशीर पाठबळ' दिले आहे, ज्यामुळे पाश्चात्य दबावाविरुद्ध लढण्याचे बळ इराणला मिळते.

### युद्धाचं भूत! शेअर मार्केटला ग्रहण लागणार?

मुंबई : इस्रायनने इराणवर हल्ला केल्यानंतर आता भू-राजकीय तणावामुळे सुरक्षित-मालमत्तेची मागणी वाढली आहे. सोने-चांदीचे फ्युचर्स दरांवर तेजीचा रंग चढायची शक्यता आहे, ज्यामुळे व्यापाऱ्यांना लक्षणीय वाढीच्या संधी मिळतील. याशिवाय भू-राजकीय घडामोडींमुळे वाढत्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर भारतीय बाजारात जोरदार घसरण होण्याची शक्यता आहे. अशा स्थितीत, सोमवारी व्यापार पुन्हा सुरू झाल्यावर विविध मालमत्ता, विशेषतः इक्विटी, सोने आणि चांदी, कच्चे तेलासह वेगवेगळ्या बाजारात तीव्र प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता आहे.

### काश्मीरने पहिल्यांदाच रणजी ट्रॉफी जिंकली

मुंबई : रणजी ट्रॉफी २०२५-२६ फायनल सामन्यामध्ये जम्मू-काश्मीर संघाने इतिहास रचला असून पहिल्यांदा ट्रॉफीवर नाव कोरलं आहे. जम्मू काश्मीर संघाने कर्नाटकविरूद्ध शेवटच्या दिवशी ५५० पेक्षा अधिक धावांची आघाडी घेतली. सामना ड्रॉ झाला पण पहिल्या डावातील आघाडीमुळे जम्मू काश्मीर संघाने चॅम्पियन ठरला आहे. जम्मू काश्मीरचे पहिले विजेतेपद असून ६७ वर्षांनी ही ऐतिहासिक कामगिरी घडली आहे. जम्मू काश्मीर संघाने १९५९-६० मध्ये पहिल्यांदा रणजी ट्रॉफीमध्ये भाग घेतला होता.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.२८ फेब्रुवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६२.०० क्विंटल | २,००० | २,८५० | २,२४७ |
| ज्वारी/हायब्रिड: ६९.०० क्विंटल | २,००० | ४,७०० | ३,३४२ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : २०.५० क्विंटल | ६,५०० | ७,५९० | ७,२९७ |
| उडीद : ५.५० क्विंटल | ५,२०० | ५,२०० | ५,२०० |
| बाजरी: १२.०० क्विंटल | २,००० | २,९०० | २,५७७ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १४.५० क्विंटल | ५,२५० | ५,२५० | ५,२५० |
| हरभरा: ७.०० क्विंटल | ४,७९१ | ५,००१ | ४,८९६ |

# खतांच्या दरवाढीने खरीप हंगाम धोक्यात वाढत्या खर्चामुळे शेतकरी आर्थिक कोंडीत

पुणे । प्रतिनिधी

**आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर रासायनिक खतांच्या दरात झालेल्या मोठ्या वाढीमुळे राज्यातील शेतकऱ्यांपुढे गंभीर आर्थिक संकट उभे राहण्याची चिन्हे दिसत आहेत. खतांच्या किमतींमध्ये सरासरी १५ टक्क्यांपर्यंत वाढ झाल्याचे दिसून येत असून, यामुळे शेतीचा एकूण उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. खरीप हंगामातील पेरणी जूनमध्ये होत असली तरी मे महिन्यापासूनच खतांची खरेदी सुरू होत असल्याने दरवाढीचा परिणाम शेतकऱ्यांच्या नियोजनावर आणि आर्थिक गणितावर आतापासूनच दिसू लागला आहे.**



रासायनिक खत हे शेती उत्पादनासाठी अत्यावश्यक घटक मानले जाते. नायट्रोजन, फॉस्फरस आणि पोटॅशयुक्त खतांचा वापर कमी केल्यास उत्पादनावर थेट परिणाम होतो. त्यामुळे वाढत्या दरांनंतरही शेतकऱ्यांना खत खरेदी करणे अपरिहार्य आहे. मात्र दरवाढीमुळे प्रति एकर खर्च हजारो रुपयांनी वाढण्याची शक्यता असून लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांवर याचा सर्वाधिक परिणाम होणार आहे. खतांच्या दरवाढीसोबतच बियाणे, मजुरी, औषधे आणि यंत्रसामग्रीचे दरही सातत्याने वाढत आहेत. शेती मशागतीसाठी लागणाऱ्या ट्रॅक्टर भाड्यापासून ते कापणीपर्यंत सर्वच टप्प्यांवर खर्च वाढला आहे. दुसरीकडे शेतमालाला अपेक्षित भाव मिळत नसल्याने उत्पन्न आणि खर्च यातील तफावत वाढत आहे. प्रमुख खरीप पिकांपैकी सोयाबीनचा सध्याचा बाजारभाव सुमारे ५ हजार रुपये प्रति क्विंटलच्या आसपास असला तरी वाढलेल्या खर्चाच्या तुलनेत हा दर तोट्यातच जात असल्याचे शेतकरी सांगत ▶▶ पान २ वर

## दादांच्या विमान अपघाताचा प्राथमिक अहवाल

### विमान प्रथम झाडांना धडकले आणि नंतर जमिनीवर आदळले

मुंबई । प्रतिनिधी

**दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातासंदर्भात हवाई उड्डाण मंत्रालयाच्या एएआयबी तपास यंत्रणेचा २२ पानांचा प्राथमिक अहवाल समोर आला आहे. त्यामध्ये कमी दृश्यमानता व्हीएफआर नियमांचे संभाव्य उल्लंघन आणि अनकंट्रोल्ड एअरफिल्डवरील सुरक्षा त्रुटी याकडे गंभीर बोट ठेवण्यात आले आहे. २८ जानेवारी रोजी झालेल्या या अपघातात अजित पवारांसह एकूण पाच जणांचा मृत्यू झाला होता.**



मुंबईहून बारामतीकडे निघालेल्या नॉन-शेड्युल्ड/व्हीआयपी फ्लाइटने रनवे ११ वर लँडिंगचा प्रयत्न केला. पहिल्या प्रयत्नात 'गो अर्नोड करण्यात आला. दुसऱ्या प्रयत्नात पायलटने कळवले. मात्र अटीसी ने ३ किमी दृश्यमानता नोंदवली, जी व्हीएफआर अंतर्गत आवश्यक ५ किमीपेक्षा कमी होती. ▶▶ पान २ वर

## सुनेत्राताईंच्या खात्याची उत्तरं मंत्री मुश्रीफ अन भरणे देणार

मुंबई । प्रतिनिधी

**राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दरम्यान एक मोठी माहिती समोर आली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे असलेल्या तीनपैकी एकाही खात्याची उत्तरं या अधिवेशनात त्या स्वतः देणार नाहीत. त्यांच्या खात्यांशी संबंधित प्रश्नांची उत्तरं देण्याची जबाबदारी इतर मंत्र्यांवर सोपवण्यात आल्याची माहिती आहे. क्रीडा आणि अल्पसंख्याक खात्याची उत्तरं देण्याची जबाबदारी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्यावर देण्यात आली आहे. तर राज्य उत्पादन शुल्क खात्याशी संबंधित प्रश्नांची उत्तरं देण्याची जबाबदारी ही मंत्री हसन मुश्रीफ यांच्यावर सोपवण्यात आली आहे.**

अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचं हे पहिलच



अधिवेशन आहे. त्यामुळे सभागृहात त्या काय बोलणार याकडे सगळ्यांचं लक्ष होतं. मात्र त्यांच्या खात्याची जबाबदारी आता इतर मंत्र्यांकडे देण्यात आल्याने सुनेत्रा पवार सभागृहात बोलण्याची शक्यता कमी आहे.अजित पवारांच्या निधनानंतर त्यांच्याकडे असलेली क्रिडा आणि युवा कल्याण, अल्पसंख्यांक खातं तसेच राज्य उत्पादन शुल्क खातं हे त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्याकडे देण्यात आलं. ▶▶ पान २ वर

## तुकाराम मुंढेंचा लातूरमध्ये दणका!

### अनियमितता आढळल्याने अपंगांच्या दोन शाळा कायमच्या बंद

लातूर । प्रतिनिधी

लातूर जिल्ह्यातील श्रवण आणि वाकबधीर मुलांसाठी असलेल्या दोन सरकारी अनुदानित शाळा अनियमिततेमुळे बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, असे समाज कल्याण विभागाच्या अधिकाऱ्याने सांगितले. अपंग कल्याण सचिव तुकाराम मुंढे यांनी चौकशीनंतर हा आदेश जारी केला.

उदगीर येथील राजर्षी शाहू निवासी मुकबधीर विद्यालयात अपंग कल्याण आयुक्तांनी केलेल्या तपासणीत या संस्थांमध्ये अपुरी विद्यार्थी संख्या, सरकारी पोर्टलवर विद्यार्थी नोंदणीचा अभाव आणि बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीचा अभाव यासह अनेक अनियमितता उघडकीस आल्या. तसेच, संत गाडगेबाबा निवासी कर्णबधीर विद्यालयाने २०१९ मध्ये कालबाह्य झालेल्या नोंदणीचे नूतनीकरण केले नसल्याचेही ▶▶ पान २ वर

## बंजारा समाजाचा एसटीत समावेशासाठी उच्चस्तरीय समिती गठीत

मुंबई । प्रतिनिधी

**बंजारा समाजाचा अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करण्याच्या मागणीला अखेर अधिकृत स्वरूप मिळाले आहे. महाराष्ट्र सरकारच्या आदिवासी विकास विभागाने सहा सदस्यीय उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती एम. एल. तहलियानी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**

गेल्या अनेक दशकांपासून बंजारा समाजाची एसटी प्रवर्गात समावेशाची



मागणी प्रलंबित आहे. 'हैद्राबाद गॅझेटीयर'मधील उल्लेखाच्या आधारे समाजाने ही मागणी अधिक आक्रमकपणे पुढे रेटली आहे. मराठा आरक्षणाच्या निर्णयानंतर बंजारा समाजानेही त्याच गॅझेटीयरचा संदर्भ देत, जर मराठा समाजाला त्याचा लाभ ▶▶ पान २ वर


### या जिल्ह्यात अधिक संख्या

यवतमाळ, वाशिम, अकोला, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली, बीड, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, सोलापूर, ठाणे आणि पालघर.

## अमेरिका–इस्रायलचा इराणच्या शाळा इमारतीवर हल्ला ४० विद्यार्थ्यांचा अंत

तेहरान । वृतसंस्था

इस्रायल आणि अमेरिकेनं इराणवर हल्ला केल्यानं मध्य पूर्वेतील परिस्थिती बिघडली आहे. इराणनं अमेरिका आणि इस्रायल यांच्या विरोधात युद्धाची घोषणा करत प्रतिहल्ले सुरु केले



आहेत. इराणनं बॅलेस्टिक क्षेपणास्त्रं डागली आहेत. इस्रायलवर हल्ला चढवला आहे. त्याचवेळी मध्य पूर्वेतील अमेरिकेच्या तळांनादेखील लक्ष्य केलं आहे. कतार, बहारिन, यूएई, सौदी अरेबियामध्ये अमेरिकेचे लष्करी तळ आहेत. ▶▶ पान २ वर

## ठाकरे बंधू एकत्र येऊनही मुंबई का जिंकू शकले नाही?–देवेंद्र फडणवीस

मुंबई । प्रतिनिधी

एका वृत्तवाहिनीच्या 'आयडियाज ऑफ इंडिया' कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे



यांच्यावर निशाणा साधला. ठाकरे बंधू एकत्र येऊनही मुंबई महापालिका का जिंकू शकले नाहीत? या प्रश्नावर देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर भाष्य केले आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ▶▶ पान २ वर

# भारतीयांची डेंग्यूची भिती कमी होणार...!

### २०२७ च्या सुरवातीलाच येणार स्वदेशी डेंग्यू लस

दिल्ली । वृतसंस्था

**गेल्या काही प्रमाणात भारतात डेंग्यु रुग्णांचे प्रमाण वाढलेले दिसते. एडिस इजिप्ती' या डास चावल्यास मुळात डेंग्यू होतो डेंगीच्या अळ्या जरी स्वच्छ पाण्यात तयार होत असल्या तरी पाणी साठवणूक करण्याचा अयोग्य पद्धत तसेच पाण्याचे निजोजन नसने, पाणी साठवूण ठेवणे, कुलरच्या पाण्यात किंवा फ्रीजच्या पाठीमागे पाणी साठून राहिल्यास या डासांची उत्पती होते.**


अचानक येणारा तीव्र ताप, डोळ्यांच्या मागे प्रचंड वेदना होणे, तीव्र डोकेदुखी. सांधेदुखी आणि स्नायूदुखी ही प्राथमिक लक्षणे असतात, कॉप्लीकेशन झाल्यास आसीयुत भरती करावे लागते प्लेटलेटस चढवावे लागतत यामुळे ड्रेग्यूचे उपचार खर्चिक होऊ



शकतात. पण भारतात डेग्युंची भिती कमी होणार आहे कारण भारताची पहिली स्वदेशी डेंग्यू लस आता प्रगतीच्या अंतिम टप्प्यात आहे. दिल्ली येथील 'पॅनेशिया बायोटेक' ही कंपनी भारतीय आयुर्विज्ञान संशोधन परिषद () च्या सहकार्याने ही लस विकसित करत आहे. भारताची पहिली स्वदेशी लस असलेल्या

> **“ लस घेतल्यास डेंग्यू होणार नाही, झालाच तर गंभीर स्वरूप नाही....**
>
> भारतात डेंग्यूचे चार वेगवेगळे प्रकार असल्यामुळे त्यावर प्रभावी लस बनवणे हे शास्त्रज्ञांसमोर मोठे आव्हान होते, कोरोनासारखे ही लस काम करणार आहे. डेंग्यूचा कमकूवत विषाणू शरीरात जाणार आहे. त्यामुळे भविष्यात डेग्यूचा विषाणू शरीरात शिरला शरीराची रोगप्रतिकारशक्ती या विषाणूंना 'शत्रू' म्हणून ओळखते. त्यानंतर आपली सिस्टीम त्याविरुद्ध विशिष्ट 'अँटीबॉडीज' () आणि 'मेमरी सेल्स' तयार करुन लढू शकते. त्यामुळे डेंग्यू होणार नाही आणि झालाच तर पेशंटची क्रिटीकल कंडीशन होणार नाही. थोड्याशा उपचाराने बरा होऊन जाईल.

या लसीचे नाव 'डेंगीऑल' असून ही लस आता क्लिनिकल चाचण्यांच्या तिसऱ्या आणि अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. या वर्षाच्या अखेरीस किंवा २०२७ च्या सुरुवातीला ही लस सर्वसामान्यांसाठी उपलब्ध होण्याची शक्यता आहे.भारतात डेंग्युचे प्रमाण वाढले आहे. गेल्या २०२१ पासून आतापर्यंत १० लाख जणांना डेंग्यू झाला आहे ▶▶ पान २ वर



## बीडमध्ये दैनिकाचे कार्यालय फोडले

बीड । प्रतिनिधी

येथून प्रकाशित होणाऱ्या साय दैनिक सिटीजन या कार्यालयावर शनिवारी रात्री साडेसातच्या दरम्यान काही अज्ञातांनी हल्ला करत कार्यालयातील संगणक व इतर साहित्याची तोडफोड करून नुकसान केले प्रॉपर्टीचा वाद मिटवण्यासाठी या कार्यालयात दोन गट आले होते आणि या गटात झालेल्या बाचाबाची नंतर ही तोडफोड करण्यात आली.

शहरातील बशीर गंज भाजी मंडई रोडवर असलेल्या साई दैनिक ▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# वारशाची जबाबदारी अन् नेतृत्वाची खरी कसोटी

राजकारणातील वारसा, सहानुभूतीची लाट आणि संघटनात्मक वास्तव यांचा संगम जेव्हा एखाद्या नेत्यासमोर उभा राहतो, तेव्हा त्या नेतृत्वाची खरी कसोटी सुरू होते. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवार यांनी सूत्रे स्वीकारल्यानंतर नेमकी हीच कसोटी त्यांच्या वाट्याला आली आहे. उपमुख्यमंत्रिपदाच्या जबाबदारीनंतर पक्षाचे सर्वोच्च नेतृत्व त्यांच्या हाती देण्याचा निर्णय अनेकांना अपेक्षित वाटत असला, तरी त्यामागील राजकीय आणि संघटनात्मक गुंतागुंत तितकीच गंभीर आहे. वारशाने नेतृत्व मिळते, पण त्या नेतृत्वाला स्वीकारार्हता आणि स्थैर्य देण्यासाठी स्वतःची ओळख आणि निर्णयक्षमता सिद्ध करावी लागतेहे वास्तव सुनेत्राताईंनाही लवकरच अनुभवायला मिळणार आहे.

सुनेत्रा पवार यांच्या पाठी राजकारणाचा मजबूत वारसा आहे. पवार कुटुंब महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रभावी केंद्र राहिले आहे. माहेर आणि सासर या दोन्ही बाजूंनी राजकीय परंपरा लाभलेली असल्याने संघटनात्मक आणि सत्ताकारणाची प्राथमिक जाण त्यांना अपरिचित नाही. कार्यकर्त्यांच्या सहानुभूतीची लाट आणि अजित पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर निर्माण झालेली भावनिक पोकळी यामुळे त्यांना नैसर्गिक पाठिंबा मिळाल्याचे दिसते. मात्र सहानुभूती हा पाया असला, तरी टिकाऊ नेतृत्वासाठी ठोस राजकीय हस्तक्षेप, निर्णयक्षमता आणि संघटनावर पकड या गुणांची आवश्यकता असते.

राष्ट्रीय अध्यक्षपदी निवडीनंतर झालेली पहिली पत्रकार परिषद हा त्यांच्या नेतृत्वाचा पहिला सार्वजनिक क्षण होता. माध्यमांना अपेक्षा होती की नव्या अध्यक्षा पक्षाच्या पुढील वाटचालीबाबत स्पष्ट भूमिका मांडतील, कार्यकर्त्यांना दिशा देतील आणि निर्माण झालेल्या संभ्रमाला पूर्णविराम देतील. मात्र त्यांच्या संवादाशिवायच परिषद संपुष्टात आल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले. त्यांच्या मनःस्थितीबाबत दिलेली स्पष्टीकरणे असोत किंवा पक्षातील काही नेत्यांनी त्यांना बोलू दिले नाही, अशा चर्चांना मिळालेली हवा असोया सर्व घटनांनी पक्षातील अंतर्गत शक्तिसमीकरणांचा संकेत दिला. नेतृत्वाची औपचारिक जबाबदारी स्वीकारणे आणि प्रत्यक्ष नियंत्रण प्रस्थापित करणे यातील फरक अधोरेखित झाला. अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षावर नियंत्रण मिळवण्याच्या हालचालींची चर्चा उघडपणे झाली. सहानुभूतीच्या वातावरणातही महत्त्वाकांक्षा शांत राहत नाही, हेच पुन्हा एकदा स्पष्ट झाले. अनेक नेते आणि गट आपल्या प्रभावक्षेत्राचा विस्तार करण्यासाठी सज्ज असल्याचे संकेत मिळाले. या पार्श्वभूमीवर सुनेत्रा पवार यांचे नवखेपण काहींसाठी संधी ठरू शकते. नेतृत्वाला आव्हान देण्याचे प्रयत्न, अंतर्गत कुरघोड्या आणि दबावाचे राजकारण ही कोणत्याही मोठ्या पक्षाची अपरिहार्य वास्तवता असते. या सगळ्यातून मार्ग काढताना त्यांना संयम, ठामपणा आणि योग्य सल्लागारांची निवड यांचा समतोल साधावा लागेल. अजित पवार यांच्या निधनाच्या प्रसंगात त्यांनी दाखवलेले धैर्य कार्यकर्त्यांना प्रेरक वाटले. वैयक्तिक दुःखाच्या छायेतही त्यांनी संयम राखला, ही बाब त्यांच्या मानसिक ताकदीची साक्ष देते. पण वैयक्तिक धैर्य आणि राजकीय नेतृत्व या दोन भिन्न कसोट्या आहेत. राजकारणात मौन कधी कधी ताकदीचे प्रतीक ठरते, पण सातत्याने मौन राखणे नेतृत्वाबद्दल संभ्रम निर्माण करू शकते. कार्यकर्त्यांना दिशा, जनतेला आश्वासन आणि विरोधकांना प्रत्युत्तर देण्यासाठी स्पष्ट संवाद आवश्यक असतो. नेतृत्वाचा आवाज हा केवळ व्यक्तीचा नसतो, तर संपूर्ण संघटनेचा आत्मविश्वास असतो. पक्षाच्या बाहेरही अनेक प्रश्न त्यांच्या समोर उभे आहेत. अजित पवार यांच्या अपघाताबाबत सुरू असलेल्या चर्चा, आरोप-प्रत्यारोप आणि राजकीय प्रतिक्रिया यामुळे कार्यकर्त्यांमध्ये आणि जनतेमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. या परिस्थितीत पक्षाची अधिकृत भूमिका स्पष्ट करणे, भावनिक वातावरणाला संतुलित ठेवणे आणि अनावश्यक वाद टाळणे ही जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आहे. त्याचबरोबर कुटुंबातील सदस्यांशी संबंधित वाद, भ्रष्टाचाराच्या आरोपांची चर्चा आणि विरोधकांकडून होणारी टीका यांना तोंड देताना राजकीय परिपक्वता दाखवावी लागेल. सुनेत्रा पवार यांच्यासमोर आणखी एक मोठे आव्हान म्हणजे पक्षाची संघटनात्मक एकजूट टिकवणे. अजित पवार यांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती उभ्या राहिलेल्या संघटनेला आता नवे केंद्रबिंदू आवश्यक आहे. कार्यकर्त्यांचा विश्वास संपादन करणे, स्थानिक नेतृत्वाला संधी देणे आणि पक्षाची राजकीय ओळख टिकवून ठेवणे ही प्राथमिक उद्दिष्टे असतील. तसेच भविष्यातील नेतृत्व म्हणून पुढील पिढीला तयार करण्याची जबाबदारीही त्यांच्यावर येऊ शकते. कुटुंबीय वारसा आणि संघटनात्मक लोकशाही यामध्ये संतुलन राखणे हे त्यासाठी महत्त्वाचे ठरेल. महाराष्ट्राच्या राजकारणात महिला नेतृत्वाची प्रभावी परंपरा आहे. अनेक महिलांनी संघटना उभारल्या, सत्ता सांभाळली आणि संकटांवर मात करत स्वतःची छाप निर्माण केली. त्यामुळे सुनेत्रा पवार यांच्यासमोरही अशक्य असे काही नाही. मात्र त्यासाठी केवळ वारसा किंवा सहानुभूती पुरेशी ठरणार नाही. ठाम निर्णय, स्पष्ट भूमिका, संवादकौशल्य आणि संघटनावर नियंत्रण या गुणांची जोड आवश्यक आहे. आज त्यांच्या नेतृत्वाकडे कार्यकर्ते आशेने पाहत आहेत, तर विरोधक संशयाने. या दोन टोकांच्या दरम्यान उभे राहून स्वतःची ओळख निर्माण करणे हेच त्यांचे खरे आव्हान आहे. वारशाने मिळालेल्या पदाला वैयक्तिक कर्तृत्वाची जोड देऊन ते टिकवणे हीच खरी राजकीय कसोटी असते. आगामी काळात त्या ही कसोटी कशी पार करतात, यावर केवळ त्यांच्या राजकीय भविष्याचा नाही, तर त्यांच्या पक्षाच्या स्थैर्याचाही निर्णय होणार आहे.

# वाळू माफियाचे दोन ट्रॅक्टर जप्त करून, गुन्हे दाखल

**अंबड । प्रतिनिधी**

**अंबड तालुक्यात अवैध गौण खनिज व वाळू उत्खनन करणाऱ्यांविरुद्ध महसूल विभागाने धडक मोहीम उघडली आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल आणि उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार विजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील पथकाने अंबड आणि गोंदी पोलीस ठाण्यांच्या हद्दीत दोन वेगवेगळ्या कारवाई करत अवैध वाळू वाहतूक करणारे ट्रॅक्टर जप्त केले आहेत.**



मौजे मठ पिंपळगाव येथील दुधना नदी पात्रात अवैध वाळू उत्खनन चालू असल्याची गोपनीय माहिती तहसीलदार विजय चव्हाण यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे तलाठी स्वप्नील खरात व त्यांच्या पथकाने पाळत ठेवून लालवाडी फाटा येथे एक वाळूने भरलेला ट्रॅक्टर पकडला. सदर वाहनावर कोणताही नोंदणी क्रमांक नव्हता. चालकाकडे जागेवर कोणतीही वैध पावती किंवा ई-चलन आढळून आले नाही. नंतर सादर करण्यात आलेली पावती देखील तपासणीअंती अवैध असल्याचे व वाहनाला जीपीएस नसल्याचे निष्पन्न झाले. या कारवाईत महसूल विभागाने स्वराज ७४४ मॉडेलचा केशरी रंगाचा ट्रॅक्टर (चेसिस क्र. ५३२७८४२) आणि १ ब्रास वाळू असा एकूण ७,०५,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून तहसील कार्यालय, अंबड येथे जमा केला आहे. याप्रकरणी तलाठी स्वप्नील खरात यांच्या फिर्यादीवरून अंबड पोलीस ठाण्यात ट्रॅक्टर चालक रईस सय्यद आणि मालक अमोल शिवनाथ जिगे (दोघेही रा. मठ पिंपळगाव) यांच्यावर बी.एन.एस. २०२३ च्या कलम ३०३(२), ३(५), महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४८(७), ४८(८), खाण अधिनियम १९५२ च्या कलम ३, ४ आणि पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ च्या कलम ९, १५ नुसार प्रथम खबर क्र. ०११५ अन्वये दि. २८/०२/२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोंदी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका गुन्ह्यातील आरोपीला जामीन मिळाला होता व न्यायालयाने वाहन सोडण्याचे आदेश दिले होते; परंतु महसूल विभागाचा दंड भरण्यात आलेला नव्हता. दंडात्मक कार्यवाहीसाठी सदर ट्रॅक्टर जप्त करून तहसील कार्यालयात आणण्याची कारवाई मंडळ अधिकारी कृष्णा हेडके, तलाठी विश्वास ढवळे, कोतवाल मनोज उघडे व त्यांच्या पथकाने केली. हे ट्रॅक्टर कुख्यात गुंड विलास शिंदे उर्फ वकिल्या याच्या मालकीचे असल्याचे निष्पन्न झाले आहे. वाहन जप्त करून आणत असताना काही महिलांनी अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला, परंतु गोंदी पोलीस ठाण्याचे पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत चोख बंदोबस्त पुरवला व सदर ट्रॅक्टर तहसील कार्यालयात जमा करण्यात आले. या दोन्ही कारवाया यशस्वी करण्यासाठी मंडळ अधिकारी व तलाठी, तसेचअंबड तहसीलचा पथक श्याम विभूते, विकास डोळसे, गाडेकर, कोतवाल मनोज उघडे आणि पोलीस पाटील हे होते.

# सीसीआयची कापूस खरेदी अचानक बंद पुन्हा शेतकऱ्यावर संकट

## मुदतवाढ देण्याची तात्यासाहेब चिमणे यांची मागणी

अंकुश सोनवणे। घनसावंगी

**सीसीआयचा कापूस खरेदी केंद्र अचानक बंद झाल्यामुळे हजारो कुंटल कापूस शेतकऱ्याकडे शिल्लक आहे सरकारने तत्काळ मुदतवाढ देण्यात यावे अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तात्यासाहेब चिमणे यांनी केले आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तात्यासाहेब चिमणे यांन सीसीआयच्या उपमहाप्रबंधकांकडे निवेदन सादर करून कापूस खरेदी केंद्रास मुदतवाढ देण्याची मागणी केली आहे. निवेदनात तालुक्यात अजूनही मोठ्या प्रमाणात कापूस साठा शिल्लक असल्याचे नमूद करून, सर्व नोंदणीकृत शेतकऱ्यांचा कापूस हमीभावाने खरेदी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. नोंदणी करूनह कापूस विक्री न झालेल्या हजारो शेतकऱ्यांना न्याय मिळावा, खरेदी केंद्रे सुरू ठेवावीत आणि हमीभावाचा लाभ सर्वांना मिळावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरत आहे. नसता शेतकऱ्यावर मोठा अन्याय होणार असल्याचे चित्र समोर आहे.**

घनसावंगी तालुक्यात शासकीय हमीभावाने कापूस विक्रीसाठी नोंदणी केलेल्या हजारो शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. भारतीय कपास निगम लिमिटेड (सीसीआय) कडून शुक्रवार (दि. २७) फेब्रुवारीपासून कापूस खरेदी बंद करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आल्याने तब्बल ३२६२ शेतकरी कापूस विक्रीशिवाय वेटिंगवर राहिले आहेत. या निर्णयामुळे तालुक्यातील शेतकरी वर्गात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



नोंदणी करूनही कापूस विक्री न झालेल्या हजारो शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. घनसावंगी तालुक्यात शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात ऑनलाईन नोंदणी करून कापूस विक्रीसाठी तयारी केली होती. उपलब्ध नोंदणी करूनही हजारो शेतकऱ्यांचा कापूस शिल्लक असतानाच खरेदी बंद करण्याचा निर्णय घेतल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत. भारतीय कपास निगम लिमिटेडच्या छत्रपती संभाजीनगर शाखेकडून जारी करण्यात आलेल्या निवेदनानुसार, पीक वर्ष २०२५-२६ साठी किमान आधारभूत किंमत (सीसीआय) कापूस खरेदीची अंतिम तारीख २७ फेब्रुवारी २०२६ निश्चित करण्यात आली होती. कपास किसान ॲपवर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना स्लॉट बुक करून अंतिम तारखेपूर्वी कापूस विक्री करण्याचे आवाहन करण्यात आले होते. सध्या खुल्या बाजारात कापसाचे दर अनिश्चित असून हमीभाव केंद्रांच्या तुलनेत प्रति क्विंटल सुमारे १५०० रुपयांनी कमी दर मिळत असल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली. त्यामुळे बहुतेक शेतकरी हमीभावासाठी सीसीआय केंद्रांवर अवलंबून होते. गेल्या चार महिन्यांपासून अनेक शेतकरी ऑनलाईन नोंदणी करून स्लॉटची प्रतीक्षा करत होते. मात्र अचानक खरेदी बंद झाल्याने व्यापाऱ्यांकडे कमी दरात कापूस विकण्याची वेळ येण्याची भीत व्यक्त होत आहे. शासनाने तत्काळ सीसीआय कापूस खरेदी मुदतवाड देण्यात यावे. मुदतवाड ना दिल्यास शेतकऱ्यावर आत्महत्या करण्याचा वेळ येऊ शकतो असे बोलल्या जात आहे याची जबाबदारी सरकार शासनावर राहील.

# अजित दादा कर्ते सुधारक होते-कल्याण आखाडे

## • अजित स्मृती व्याख्यानमालेस बीडमध्ये प्रारंभ

**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्राच्या राजकारणात अजित दादा पवार यांच्या सारखा नेता दुसरा होणार नाही.प्रत्येक बाबतीत त्यांचे वेगळेपण होते. राजकिय नेते बोलतात जास्त आणि कृती कमी करतात.अजित दादा हे पुर्णपणे कर्ते सुधारक होते. आपल्या राजकिय जीवनातला प्रत्येक क्षण त्यांनी कृती करण्यामध्येच घालवला. भाजपा प्रणित आघाडी सोबत जाण्याचा निर्णय घेतल्यानंतर अजित दादा गेल्या तीन वर्षापासून स्वयंभू नेते झाले होते.त्यांनी स्वत:ला पुर्णपणे सिध्द केले होते. आता भविष्यात एकहाती राज्य मिळवण्यासाठी त्यांचे नेतृत्व तयार असतानाच त्यांची अकाली एक्झीट झाली अशी खंत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे स्टार प्रचारक कल्याण आखाडे यांनी व्यक्त केली.**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या बीड जिल्हा शाखेच्या वतीने अजित स्मृती व्याख्यानमाला सुरु करण्यात आली आहे. अजित दादांचे निधन २८ तारखेला झाले. ही तारीख कायम लक्षात राहावी आणि त्या दिवशी दादांचे स्मरण व्हावे, त्यांच्या आठवणींचा जागर व्हावा या उद्देशाने प्रत्येक महिन्याच्या २८ तारखेला बीडमध्ये व्याख्यान होणार आहे. त्याची सुरुवात काल २८ फेब्रुवारी रोजी झाली. पहिले व्याख्यान कल्याण आखाडे यांचे झाले. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, बीड जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष मानूरकर,लोकपत्रकार भागवत तावरे, पत्रकार संघाचे बीड शहर अध्यक्ष प्रतिक कांबळे, जेष्ठ नेते लक्ष्मणराव ढवळे आदि मान्यवर उपस्थित होते. आखाडे यांनी आपल्या भाषणात अजित दादांच्या सर्वांगिण कलागुणांचा गौरव केला. दादा पश्चिम महाराष्ट्रात जन्मले असले तरी राज्याच्या प्रत्येक भागातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जाण त्यांना होती. प्रश्न समजून घेवून त्याची उकल करणारे दादा एक प्रकारचे चालते बोलते लोक न्यायालयच होते. त्यांच्या दरबारात होणाऱ्या प्रत्येक बैठकीतून लोकहिताचाच निर्णय होत असे. छत्रपती शिवाजी महाराजांचे फक्त नाव न घेता त्यांचे विचार जगण्याचे काम दादांनी केले. त्यांच्या मंत्रीमंडळात नेहमी सर्व जाती, धर्मांना स्थान मिळाले. पक्ष संघटनेत सुध्दा दादांनी अष्टप्रधान मंडळा प्रमाणे रचना केली होती. त्यांच्याकडे अद्भुत अशी चुंबकिय शक्ती होती. ज्यामुळे त्यांच्याशी जोडला गेलेला व्यक्ती किंवा कार्यकर्ता पुन्हा त्यांच्यापासून दुर गेला




नाही.दादा या नावाप्रमाणेच ते अनेकांचे आधार बनले होते. माझी राजकिय आणि सामाजिक जीवनाची सुरुवात कम्युनिस्ट विचारातून झाली. कॉ.अतहर बाबर यांच्या सोबत मी काम सुरु केले. त्यानंतरच्या काळात गोपीनाथराव मुंडे यांनी मला राजकिय साथ दिली आणि आता माझे संपुर्ण भविष्य अजित दादांच्या नेतृत्वावर अवलंबून होते. हे तीनही नेते आज हयात नाहीत याची खंत आखाडे यांनी बोलून दाखवली. या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांनी अजित दादा पवार यांच्या कार्यशैलीचे वर्णन केले. बीडचे पालकमंत्री म्हणून जबाबदारी स्विकारल्यानंतर हा जिल्हा आता बारामती प्रमाणे विकासाच्या बाबतीत पुढे जाईल असा विश्वास जनतेमध्ये निर्माण झाला होता. मात्र आता बीडकरांची घोर निराशा झाली आहे.प्रसिध्दी माध्यमांनी सुरुवातीचे अनेक वर्ष अजित दादांची प्रतिमा चुकीच्या पध्दतीने बनवली.मात्र गेल्या काही वर्षात स्वतंत्र भूमिका घेतल्यापासून दादांनी प्रत्येकाच्या मनात घर केले होते. त्यांची विनोदी शैली, प्रशासनातील दरारा,जनतेचे प्रश्न सोडवण्याची हातोटी यामुळे ते लोकप्रियतेच्या शिखरावर पोहचले होते. त्यांच्या अचानक जाण्यामुळे महाराष्ट्र एका कर्तबगार मुख्यमंत्र्याला मुकला आहे असे मुंडे म्हणाले.

# पान १ वरून...

### खतांच्या दरवाढीने खरीप हंगाम धोक्यात

आहेत. कापूस, तूर आणि इतर पिकांच्या दरातही सातत्याने चढ-उतार होत असल्याने शेतकऱ्यांना स्थिर उत्पन्न मिळणे कठीण झाले आहे. यावर्षीच्या हवामानातील अनिश्चिततेनेही शेतीवर मोठा परिणाम केला आहे. सततच्या पावसामुळे खरीप हंगामातील उत्पादन घटले, तर रब्बी हंगामात दमट हवामानामुळे रोगांचा प्रादुर्भाव वाढून तूर व हरभरा पिकांचे नुकसान झाले. उत्पादन घटल्यामुळे आधीच आर्थिक फटका बसलेल्या शेतकऱ्यांसमोर आता वाढत्या खतदरांचे नवीन संकट उभे ठाकले आहे. अनेक शेतकरी कर्ज काढून शेती करत असल्याने वाढलेला खर्च परतफेडीचे ओझे अधिक वाढवणार आहे. खतांच्या वाढत्या किमती, मजुरीचा वाढता खर्च आणि घटते बाजारभाव यामुळे शेती व्यवसाय टिकवणे दिवसेंदिवस कठीण होत असल्याची भावना शेतकऱ्यांत व्यक्त होत आहे. उत्पादन खर्चावर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने खतांच्या दरावर नियंत्रण ठेवावे, अनुदान वाढवावे तसेच शेतमालाला हमीभाव मिळवून देण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकरी संघटनांकडून होत आहे. आगामी खरीप हंगाम हा शेती अर्थकारणासाठी निर्णायक मानला जात असताना खतांच्या दरवाढीमुळे शेतकऱ्यांचे नियोजन कोलमडण्याची भीती व्यक्त होत आहे. वेळेत उपाययोजना न झाल्यास उत्पादनावर आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

------------

### सुनेत्राताईंच्या खात्याची उत्तरं

तर अर्थखातं हे स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे गेलं. अजित पवारांचं २८ जानेवारी रोजी विमान अपघातात निधन झालं. त्यानंतर राज्यसभेत खासदार असलेल्या त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी ३१ जानेवारी रोजी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदीही निवड करण्यात आली आहे. तर त्यांच्या जागेवर राज्यसभेत पार्थ पवार यांना पाठवण्यात येणार आहे.

----------------

### दादांच्या विमान अपघाताचा

लँडिंग क्लिअरन्सनंतर काही क्षणांत विमान रनवेच्या डावीकडे सुमारे ५० मीटर अंतरावर झाडांवर आदळले आणि त्यानंतर आग लागून पूर्णतः नष्ट झाले असं या अहवालात म्हटलं आहे.प्राथमिक निष्कर्ष काय सांगतात? व्हीएफआर मर्यादेपेक्षा कमी असूनही लँडिंगचा प्रयत्न. फ्लाइटसाठी अनकंट्रोल्ड एअरफिल्डवरील ऑपरेशन.हवामान आणि मूलभूत नेव्हिगेशन सहाय्यांमध्ये कमतरता.एअरफिल्ड सुविधांचे अपुरे मानक.हवामान आणि तांत्रिक बाबी ,बारामती येथे अधिकृत सुविधा नाही.उपग्रह चित्रांनुसार परिसरात हलके धुके ,पुणे व मुंबईतही २०००२५०० मीटर नोंदली गेली.बारामती विमानतळातील सुरक्षा त्रुटी ,रन वेवरील मार्किंग सहज दिसू शकतील असे नाही,रन वेवर बारीक खडी आढळली,न वेला परिपूर्ण कुंपण नाही.विमानतळावर अग्निशमन सुविधा नाही एफडीआर विश्लेषण सुरू असून सीव्हीआर डेटा रिकव्हरीनंतर अंतिम अहवाल जाहीर होणार आहे. या अहवालातील निष्कर्षांनंतर विमान सुरक्षा नियमांमध्ये सुधारणा आणि अनकंट्रोल्ड विमानतळांवरील ऑपरेशन्ससाठी नव्या मार्गदर्शक तत्त्वांची अपेक्षा आहे रनवेची दृश्यमानता कमी होती, साधारणतः पाच किलोमीटर दृश्यमानता आवश्यक होती. दृश्यमानता ३ किलोमीटरपर्यंत असल्याची माहिती नियंत्रकाने कॉकपिटला कळवली. त्यावेळी विमानाने पुन्हा एक वळण घेतलं. त्यानंतर रनवे दिसतोय असं नियंत्रकाला सांगण्यात आलं. मग लँडिंग क्लिअरन्स देण्यात आला. त्यानंतर लँडिंगवेळी 'ओह शीट, ओह शीट' हे शब्द ऐकू आले. तसेच या विमानातील दोन्ही पायलटनी मद्यपान केलं नसल्याचंही या अहवालात म्हटलं आहे.

----------------

### बंजारा समाजाचा एसटीत समावेशासाठी

मिळू शकतो, तर बंजारा समाजाला का नाही? असा सवाल उपस्थित केला आहे. समितीची रचना समितीत मानववंशशास्त्र, समाजशास्त्र आणि कायदा क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला आहे.यामध्ये न्या. एम. एल. तहलियानी अध्यक्ष,डॉ. सी. जे. सोनोवाल मानववंश शास्त्रज्ञ : सदस्य डॉ. शैलेशकुमार दारोकर समाजशास्त्रज्ञ : सदस्य, ॲड. नितीन गांगल कायदेतज्ज्ञ : सदस्य,डॉ. संदीपान गव्हाळे विशेष अभ्यासक : सदस्य, सहसंचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे सदस्य सचिव ही समिती बंजारा समाजातील उपवर्गांसह संपूर्ण समाजाचा प्रवर्गात समावेश करण्याच्या मागणीचा सखोल अभ्यास करणार आहे. मात्र, शासन निर्णयात समितीला अहवाल सादर करण्यासाठी कोणतीही कालमर्यादा निश्चित करण्यात आलेली नाही.४ नोव्हेंबर २०२५ रोजी मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बंजारा समाजाच्या आरक्षणासंदर्भात उच्चस्तरीय बैठक पार पडली होती. इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या पुढाकारातून आयोजित या बैठकीचे इतिवृत्त ११ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आले. त्यानंतर आता आदिवासी विकास विभागाने समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.बंजारा समाज देशातील एक मोठा सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा असलेला समाज मानला जातो. देशभरात अंदाजे १२ कोटी आणि महाराष्ट्रात १ कोटींहून अधिक लोकसंख्या असल्याचा अंदाज व्यक्त केला जातो. राज्यात सुमारे ७५ लाख बंजारा मतदार असल्याची चर्चा असून, किमान १० लोकसभा आणि ४५ विधानसभा मतदारसंघांमध्ये त्यांचा प्रभाव निर्णायक ठरू शकतो.

--------------

### तुकाराम मुंढेंचा

चौकशीत आढळून आले. त्यानंतर या दोन्ही शाळा बंद करण्याचे आदेश देण्यात आले. आदेशांची अंमलबजावणी न केल्यास संस्थांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही मुंढे यांनी दिला आहे.

--------------

### ठाकरे बंधू एकत्र येऊनही मुंबई का

जो मुंबईचा मराठी माणूस आहे, तो देखील हे पाहतो आणि विचार करतो की त्यांनी काय काम केले आहे. मुंबईतील मराठी माणसांना गेल्या ३० वर्षांत उद्धव ठाकरेंनी काय दिले? काहीही दिलेले नाही. उद्धव ठाकरे हे गेल्या १५ वर्षांत स्वतः मुंबईच्या महापालिकेत लक्ष घालत आहेत. मुंबई महापालिका निवडणुकीच्या प्रचारादरम्यान मी त्यांना खुले आव्हान दिले होते. उद्धव ठाकरे हे त्यांच्या भाषणात मुंबईच्या विकासाबाबत बोलले तर मी १०० रुपये देईन. त्यानंतर मी माझ्या बक्षीसाची रक्कम ३ हजारांपर्यंत वाढवली, तरीही उद्धव ठाकरे मुंबईच्या विकासाबाबत काहीही बोलले नाहीत. इतकेच नाही तर मी त्यांना आणखी एक खुले आव्हान दिले होते की, मुंबईत तुमचा एक आयकॉनिक प्रकल्प दाखवा. पण उद्धव ठाकरे ते देखील सांगू शकले नाही. त्यामुळे लोकांना हे समजते की एवढ्या वर्षांत मुंबईतील मराठी माणूस मुंबईतून बाहेर गेला. तरी ते मुंबईतील मराठी माणसांसाठी फक्त बोलत राहिले, पण एवढ्या मोठ्या महापालिकेवर त्यांची सत्ता असतानाही उद्धव ठाकरेंनी मराठी माणसांना काहीही दिलं नाही, असे त्यांनी म्हटले.देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, मराठी माणसांना साधं घरही उद्धव ठाकरे देऊ शकले नाही. दुसरीकडे लोकांनी हे पाहिलं की आम्ही बीडीडी चाळीचा पुनर्विकास करून लोकांना घरे दिली. तेव्हा लोकांच्या लक्षात आले की लोकांसाठी कोण महत्वाचे आहे. त्यामुळे आम्हाला मुंबईतील मराठी माणसांनीही मतदान केलं आणि आम्ही निवडून आलो, असे म्हणत त्यांनी ठाकरेंवर निशाणा साधला.

--------------

### अमेरिका-इस्त्रायलचा इराणच्या शाळा

त्यावर इराणनं क्षेपणास्त्र हल्ले केले आहेत. इस्रायल आणि अमेरिकेनं इराण विरोधात संयुक्त लष्करी कारवाई केली आहे. या कारवाईत इराणचं नुकसान झालं आहे. इराणची सरकारी एजन्सी च्या माहितीनुसार, दक्षिण इराणच्या होर्मोजगान प्रांतातील मिनाब शहरातील एका शाळेवर अमेरिका-इस्रायलनं हवाई हल्ला केला. या हल्ल्यात ४० विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे.आज सकाळी अमेरिकेनं जियोनिस्ट शासनाच्या साथीनं देशातील अनेक भागांवर हवाई हल्ले केल्याचा दावा इराणच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेनं केला आहे. 'या कारवाईंनी इराणी जनता दबावाखाली येईल, असं शत्रूला वाटतं. पण तसं काहीही होणार नाही. इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराणच्या सशस्त्र दलांनी पलटवार सुरु केला आहे. जीवनावश्यक वस्तू आणि सेवांचा पुरेसा साठा देशाकडे आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरु नये. पुढील सूचना मिळेपर्यंत शाळा आणि महाविद्यालयं बंद राहतील. बँकांच्या सेवा सुरुच राहतील. सरकारी कार्यालयं ५० टक्के क्षमतेनं काम करतील,' असं सुरक्षा परिषदेकडून सांगण्यात आलं आहे.अमेरिका आणि जियोनिस्ट शासनानं आमच्या सार्वभौमत्वाचं उल्लंघन केलं आहे. आमच्या अनेक सुरक्षा तळांवर, केंद्रांना लक्ष्य करण्यात आलं आहे. नागरी भागात हल्ले करण्यात आले आहेत, अशी माहिती इराणच्या परराष्ट्र मंत्रालयानं दिली आहे. संभाव्य धोका लक्षात घेऊनही इराणनं आंतरराष्ट्रीय समुदाय आणि विविध देशांशी संवाद साधण्याचा मार्ग निवडला. तणाव टाळण्याचा आमचा प्रयत्न होता, असं मंत्रालयाकडून सांगण्यात आलं आहे. 'युद्ध टाळण्यासाठी हरतऱ्हेचे प्रयत्न करण्यात आले. पण सद्यस्थितीत देशाची सुरक्षा करणं आणि शत्रूच्या हल्ल्याचा मुकाबला करणं अनिवार्य आहे,' असं मंत्रालयानं म्हटलं आहे.

----------------

### बीडमध्ये दैनिकाचे

सिटीजन या कार्यालयावर रात्री साडेसातच्या दरम्यान हल्ला करण्यात आला कार्यालयामध्ये झालेल्या या हल्ल्यात आतील संगणक खुर्ची फर्निचर यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करण्यात आले त्याचबरोबर काचाही फोडण्यात आले. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. या संदर्भात मिळालेली माहिती अशी की बालेपीर भागामध्ये दोन गटात प्रॉपर्टीचा वाद होता हा वाद मिटवण्यासाठी आज सिटीजन कार्यालयामध्ये बैठक होती दोन्ही गट समोर आले होते मात्र यावेळी झालेल्या बाचाबाची नंतर कार्यालयाची तोडफोड करण्यात आल्याचे समजते.

------------

### भारतीयांची डेंग्यूची भिती

तर यामध्ये १५०० लोकांना आपले प्राण गमवावे लागले आहे. त्यामुळेच या लसीवर जोरात काम सुरु झाले आहे. डेंग्यूचे मुख्य चार प्रकार ( - -१, -२, -३ आणि -४) असतात. डेंगीऑल ही एक 'टेट्राव्हॅलंट' लस आहे. याचा अर्थ असा की, ही एकच लस टोचल्यावर शरीर डेंग्यूच्या चारही प्रकारच्या विषाणूंविरुद्ध लढण्यासाठी तयार होते. ही लस विकसित करण्यासाठी (भारतीय आयुर्विज्ञान संशोधन परिषद) तांत्रिक आणि संशोधनात्मक मदत करत आहे. पॅनेशिया बायोटेक कंपनीकडून सध्या १०,००० पेक्षा जास्त स्वयंसेवकांवर याची चाचणी सुरू आहे. ही लस 'सिंगल डोस' (एकदाच घ्यायची) असण्याची शक्यता आहे. या लसीबरोबर इंडियन इम्युनोलॉजिकल्स लिमिटेड (): या सरकारी मालकीच्या कंपनीनेही आपल्या लसीच्या पहिल्या टप्प्यातील चाचण्या यशस्वी केल्या असून, ती देखील २०२६-२७ पर्यंत लस बाजारात आणण्याच्या तयारीत आहे. 'कोविशिल्ड' बनवणारी त्यानंतर सीरम ही कंपनी देखील डेंग्यूच्या लसीवर काम करत असून, सध्या त्यांच्या चाचण्या प्रगत टप्प्यात आहेत.

------------------

थोडक्यात



## मंत्री अतुल सावे यांचा वाढदिवस अमोल राऊत यांच्याकडून सामाजिक उपक्रमातून साजरा

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांचा अभिष्टचिंतन सोहळा काल मोठ्या उत्साहामध्ये व विविध सामाजिक उपक्रमातून काल बीड शहरांमध्ये संपन्न झाला. महाराष्ट्र सावता सेनेचे संस्थापक अध्यक्ष अमोल राऊत यांनी जिल्हा रुग्णालय बीड या ठिकाणी २५,२६ फेब्रुवारी रोजी जन्म झालेल्या कंन्या व त्या मातांना साडी वाटपाचे ,बाळाला ड्रेसचे तसेच केळी व इतर फळांचे वाटप करत सामाजिक बांधिलकी जोपासत हा उपक्रम राबवला तर या उपक्रमाबद्दल त्यांचे शहरवासीयांकडून व रुग्णांच्या नातेवाईकांकडून कौतुक केले जाऊ लागले आहे. बीड तालुक्यातील युवा नेते तथा सावता सेनेचे संस्थापक अध्यक्ष अमोल राऊत यांनी काल मंत्री अतुल सावे यांचा वाढदिवस बीड जिल्हा रुग्णालयामध्ये काल व परवा जन्म झालेल्या नवजात कन्यांना व त्यांच्या मातांना वस्त्रदान करून व फळ वाटप करून साजरा केला आहे या केलेल्या उपक्रमाबद्दल त्यांचे शहरवाशियांकडून तसेच रुग्णांच्या नातेवाईकांकडून आभार व्यक्त केले जाऊ लागले आहेत.



## कुसुमाग्रजांचे साहित्य समाजनिष्ठ व आत्मनिष्ठ होते-प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे

किल्ले धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये मराठी विभागाच्या वतीने कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात आला. या निमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते कुसुमाग्रजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. डॉ. गोपाळ काकडे यांनी उपस्थितांशी संवाद साधताना सांगितले की, कुसुमाग्रजांचे साहित्य समाजनिष्ठ व आत्मनिष्ठ होते. मराठी साहित्याला कुसुमाग्रजांच्या लेखनाने समृद्ध केले. आज मराठी भाषेला अभिजाततेचा दर्जा मिळाला आहे. यावरून भाषेचे प्राचीनत्व लक्षात येते असे महत्त्व व्यक्त केले. विभाग प्रमुख डॉ. विठ्ठल केदारी यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, पर्यवेक्षक प्रा.सच्चिदानंद ढेपे, मराठी विभागप्रमुख डॉ. विठ्ठल केदारी, डॉ. बाबासाहेब जाधव यांबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी वर्ग व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. प्रा. नागोराव वाघमारे यांनी कार्यक्रमाचे संचलन तर आभार डॉ. बाबासाहेब जाधव यांनी मानले.

# श्री खंडोबा दिपमाळ या ऐतिहासिक स्थळी 'टी-पॉईंट' सुरू होणार, पण सुरक्षेअभावी पर्यटकांत चिंता

बीड । प्रतिनिधी

**शहरात पर्यटनाला चालना देण्याच्या उद्देशाने तसेच ऐतिहासिक व धार्मिक स्थळांना भेट देणाऱ्या पर्यटकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने, पुरातत्त्व विभागाच्या वतीने श्री खंडोबा दिपमाळ या ऐतिहासिक पर्यटन स्थळी लवकरच 'टी-पॉईंट' सुरू करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे पर्यटन विकासाला गती मिळणार असली तरी, सदर स्थळी असलेल्या सुरक्षेच्या अभावाचा प्रश्न अद्यापही प्रलंबित असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.**



श्री खंडोबा दिपमाळ मंदिर हे बीड जिल्ह्यातील एक महत्त्वाचे ऐतिहासिक व धार्मिक पर्यटनस्थळ असून, येथे दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक व पर्यटक दर्शनासाठी येतात. अलीकडच्या काळात पर्यटकांची संख्या लक्षणीयरीत्या वाढत असताना, हे स्थळ आडबाजूच्या ठिकाणी असल्याने येथे सुरक्षिततेबाबत गंभीर समस्या निर्माण होत आहेत. विशेषतः सायंकाळनंतर परिसरात पोलीस बंदोबस्त नसल्याने महिला, कुटुंबीय व बाहेरून येणाऱ्या पर्यटकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत आहे.

या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात कायमस्वरूपी पोलीस चौकी स्थापन करण्याची मागणी सातत्याने करण्यात येत आहे. मात्र वारंवार पाठपुरावा करूनही जिल्हा प्रशासन व पोलीस विभागाकडून याकडे अपेक्षित गांभीर्याने दखल घेतली जात नसल्याचा आरोप मंदिर प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

यासंदर्भात प्रतिक्रिया देताना रामनाथ खोड, कोषाध्यक्ष, श्री खंडोबा दिपमाळ मंदिर, बीड, यांनी सांगितले की,श्री खंडोबा दिपमाळ मंदिर येथे दिवसेंदिवस पर्यटकांची संख्या वाढत आहे. मात्र हे पर्यटनस्थळ आडबाजूच्या ठिकाणी असल्याने येथे सुरक्षेचा अभाव प्रकर्षाने जाणवत आहे. या ठिकाणी कायमस्वरूपी पोलीस चौकी असणे अत्यावश्यक आहे.

**पोलीस चौकी करिता आम्ही गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने जिल्हा प्रशासनाकडे पाठपुरावा करत आहोत; मात्र आमच्या या न्याय्य मागणीकडे जिल्हा प्रशासन व पोलीस विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. इथे बऱ्याच मद्यपींच्या पार्ट्या होतात यामुळे भविष्यात अनुचित घटना घडण्याची भीती असल्याने पर्यटन सुविधा उभारण्या बरोबरच पर्यटकांच्या सुरक्षिततेलाही प्राधान्य देणे गरजेचे असून, प्रशासनाने तातडीने याबाबत ठोस निर्णय घेऊन इथे पोलीस चौकी उभरावी अशी मागणी नागरिक व भाविकांकडून होत आहे.**

**रामनाथ खोड**
**कोषाध्यक्ष :-श्री खंडोबा दिपमाळ मंदिर बीड**

## मराठी केवळ संवादाचे साधन नाही, तर व्यक्तिमत्त्व विकासाचा पाया आहे -भाऊसाहेब आडाळे

गेवराई । प्रतिनिधी

मातृभाषेतून शिक्षण हे व्यक्तिला सक्षम बनवते. आपली मातृभाषा तर मराठी ही अभिजात भाषा असून तिला हजारो वर्षांची समृद्ध अशी परंपरा आहे. त्यामुळे मराठी भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून व्यक्तिमत्त्व विकासाचा भक्कम पाया आहे, असे प्रतिपादन सेवानिवृत्त प्राचार्य भाऊसाहेब आडागळे यांनी केले. ते महिला महाविद्यालय, गेवराई येथे 'मराठी भाषा गौरव दिन' निमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.



जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे महिला महाविद्यालय, गेवराई च्या 'मराठी विभाग' द्वारे 'मराठी भाषा गौरव दिन' आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तात्याराम सोंडगे तर प्रमुख अतिथी सेवानिवृत्त प्राचार्य भाऊसाहेब आडागळे होते. कार्यक्रमाची सुरुवात कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन झाली. यावेळी बोलताना श्री. भाऊसाहेब आडाळे म्हणाले की, बालक सर्वप्रथम आई ची भाषा शिकते व त्याच भाषेत औपचारिक शिक्षण झाल्यास व्यक्तिमत्त्व विकास अधिक चांगल्या प्रकारे होतो. आपली मातृभाषा ही मराठी असून मराठी भाषेला हजारो वर्षांची समृद्ध अशी परंपरा आहे. म्हणूनच मराठी ला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. याचा आपल्या सर्वांना अभिमान असला पाहिजे. त्यामुळे मराठी भाषा केवळ संवादाचे साधन नसून व्यक्तिमत्त्व विकासाचा पाया आहे. असे प्रतिपादन केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ तात्याराम सोंडगे म्हणाले की, मातृभाषेतून शिक्षण घेतल्यास विद्यार्थ्यांची आकलनशक्ती, विचारप्रक्रिया आणि अभिव्यक्ती अधिक सक्षम होते. त्यामुळे मातृभाषा मराठी ला पर्याय नाही. असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. नामदेव शिनगारे यांनी प्रास्ताविकातून मराठी भाषेचे सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सामाजिक महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी कविता वाचन, वक्तृत्व आणि निबंध स्पर्धा द्वारे मराठी प्रेम व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संगीता आहेर यांनी प्रभावीपणे केले, तर प्रा. डॉ. रामहरी काकडे यांनी आभार प्रदर्शन करून उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानले. कार्यक्रमास प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान ६ वरुन...

### जय भवानी महाविद्यालयात

विभागाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या हस्तलिखित ' अक्षरवेल' या भित्तीपत्रकाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते झाले. हे भित्तीपत्रक 'कवी कुसुमाग्रज विशेषांक' या स्वरूपात तयार करण्यात आले आहे. याप्रसंगी मान्यवरांची यथोचित भाषणे झाली असून मराठी भाषा संवर्धनाची जबाबदारी सर्वच समाजाची असल्याचा सूर याप्रसंगी व्यक्त झाला. प्राचार्य डॉ. विश्वास कदम आणि प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मराठी विभागाचे प्रा. बापू घोक्षे, डॉ. रामकृष्ण प्रधान यांच्यासह डॉ. बंडू लोखंडे, प्रा. पापाजी चव्हाण, श्री. कुणाल काळे, श्री. दत्ता चादर आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास प्रतिष्ठित नागरिक, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

### पोलीस पाटील भरतीतील

सहन केला जाणार नाही.उमेदवारांनी कोणत्याही प्रकारच्या अफवा, प्रलोभन किंवा आमिषांना बळी पडू नये. कोणी अशा प्रकारची मागणी करत असल्यास त्वरित कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहनही उपविभागीय अधिकारी वसीमा शेख यांनी केले आहे. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, संपूर्ण प्रक्रिया नियमबद्ध व पारदर्शक असून गुणवत्ता व पात्रतेच्या आधारेच अंतिम निवड केली जाणार आहे.

### मोटार सायकल स्वारास

त्याचे ईतर साथीदार नामे १. अभिषेक अशोक घाटुळ रा कन्हेवाडी ता. परळी, २. कानिफनाथ विलास डुरकर, रा क्रांती नगर अंबाजोगाई, ३. यशोदिप कल्याण किर्दन, रा सातेफळ, ता. अंबाजोगाई याचेसह मिळुन केला असल्याचे सांगीतले.

सदर गुन्हयात एकुण सहा आरोपी जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. तसेच आरोपीतांकडुन गुन्हयात वापरलेल्या दोन मोटार सायकली किं. अं १,५०,०००/- रु, सहा मोबाईल कि. अं ९०,०००/- रु चे व जबरदस्तीने चोरुन नेलेले सोन्याचे दागीणे कि.अं ३,००,०००/- असे एकुण ५,४०,०००/- मुद्देमाल हस्तगत करण्यात आले आहे. वरील सहा आरोपी व मुद्देमाल पुढील तपासकामी पोलीस ठाणे युसुफ वडगांव यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरील कामगिरी ही नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने, पोलीस हवालदार जफर पठाण, महेश जोगदंड, दिलीप गिते, मारुती कांबळे, दिपक खांडेकर, गणेश मराडे, विकी सुरवसे यांनी मिळुन केली आहे.

### रमजान ईद निमित्त

कारण रस्ता पूर्णपणे बंद राहील. या रस्त्यावरून जनतेला बसस्टँड, जिल्हा न्यायालय, जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय, जिल्हा परिषद, भाजीमंडई व जिल्हा रुग्णालयात जावे लागते. आणीबाणीच्या प्रसंगी रुग्णांना वेळेवर दाखल करता येणार नाहीत. शहरात एखादी दुर्दैवी घटना घडली, तर अग्निशमन दलाच्या गाड्या १० फूट रस्ताही मोकळा राहणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.ईद बाजार सध्या छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणात भरविण्यात येत असून, मिना बाजारही तिथेच भरावा, जेणेकरून कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही. बशीरगंजमध्ये बाजाराला परवानगी दिल्यास अनुचित घटना घडल्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासन व संबंधित अधिकाऱ्यांची राहील. अशा परवानगी विरोधात न्यायालयात याचिका दाखल करावी लागेल, याची नोंद घ्यावी, अशी तक्रार करून पठाण मुकरमजान यांनी मा.जिल्हाधिकारी साहेब व प्रशासनाकडे केली आहे.

## प्रियदर्शनी प्राथमिक शाळा पाटोदा येथे डॉ. सारिका क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त स्पर्धा

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरात असणाऱ्या प्रियदर्शनी प्राथमिक शाळेमध्ये मु.अ. मोरे सर यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी बीड नगर परिषदेच्या गटनेत्या तथा संस्था संचालक मा.डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला . कार्यक्रमाची सुरुवात आदरणीय ताईसाहेब यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन करण्यात आली .यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थी शिक्षक उपस्थित होते. ताई साहेबांच्या वाढदिवसानिमित्त शाळेमध्ये आज गीत गायन ,हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली या हस्ताक्षर स्पर्धेमध्ये शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.इ.१ली अलिझा इरफान शेख इ.२ री शुभ्रा शुभम अंकुश इ३ री दुर्वा गोपाळ तारळकर इ.४ थी धनश्री आजिनाथ नागरगोजे या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळविला. यांच्यासह सई सुहास मडके, आलिया मौसीम शेख, रूहान तौशिब शेख, सर्वज्ञ प्रमोद घुमरे ,जुई अतुल बोराटे,हर्षल पांडुरंग काळे, साक्षी सखाराम शिंदे, साक्षी गणेश केदार , सार्थक सुंदर शिंदे, समाधान गोकुळ जिरेकर , रागिनी चापकानडे,श्रेया जेधे या विद्यार्थ्यांनीही बक्षीस मिळवली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री मोरे सर होते तसेच प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती गायके मॅडम व श्री बळीराम नाईकनवरे हे उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती वीर मॅडम यांनी केले व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री माताडे सर यांनी केले आलेल्यांचे आभार श्रीमती शेलार मॅडम यांनी मानले . स्पर्धेत बक्षीस मिळवणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा प्रमुख पाहुणे शिक्षक यांच्या हस्ते करण्यात आले, शेवटी परत ताईंना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचा समारोप वंदे मातरम गीताने करण्यात आला.



## विकसित भारतासाठी विज्ञानाची प्रगती महत्त्वपूर्ण ठरणार-उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड

किल्ले धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्ताने भारतरत्न डॉ. सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेस प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानिमित्ताने आयोजित व्याख्यानातून उपप्राचार्य डॉ.मिलिंद गायकवाड यांनी आपल्या व्याख्यानातून सांगितले की, डॉ. सी.व्हि. रमण यांना लहानपणापासूनच विज्ञानाची आवड होती. प्रकाशाचे परावर्तन याविषयीचा शोधनिबंध नेचर या प्रसिद्ध जर्नल मध्ये प्रकाशित झाला. तसेच त्यांच्या शोधा संबंधीची माहिती उपस्थितांना दिली. याचे विकसित भारत संकल्पणेसाठी योगदान कसे महत्वाचे आहे हे सांगितले. अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी डॉ. सी. व्हि. रमण यांच्या जीवन कार्याची माहिती दिली. त्यांना विज्ञानातील संशोधनाबद्दल नोबेल पारितोषक मिळाले होते. तसेच सर्वांनी वैज्ञानिक दृष्टीकोण बाळगावा असे सांगितले. यावेळी विचामंचावर प्रोफेसर डॉ. अशोक लाखे, पर्यवेक्षक प्रा.सच्चिदानंद ढेपे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी डॉ. स्मिता बसोले, डॉ. अनंथा गाडे यांबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी वर्ग व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. निलेश शिंदे यांनी तर आभार प्रा. सच्चिदानंद ढेपे यांनी मानले.



## भागूजीराव ढेकळे विद्यालयात शिवाजी धट यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा संपन्न

गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषि पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे सहशिक्षक शिवाजी श्रीरंग धट हे नियत वयोमानानुसार ३३ वर्षाच्या प्रदिर्घ सेवेनंतर दि.२८ फेब्रुवारी रोजी सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांचा शाळेच्या वतीने सेवापूर्ती सन्मान सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य थिटे ए. एस. हे होते.

शिवाजी श्रीरंग धट हे जून १९९३ साली साक्षाळपिंप्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, साक्षाळपिंप्री येथे सहशिक्षक म्हणून नेमणूक झाल्यानंतर तेथे ७ वर्ष सेवा केली. त्यानंतर यशवंत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कुर्ला येथे ४ वर्ष सेवा केली. दि.२२/०७/२००४ ते आतापर्यंत कृषि पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पाडळसिंगी येथे सेवा करून शनिवार दि.२८ फेब्रुवारी रोजी सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्तीच्या सेवापूर्ती गौरव सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून ह.भ.प.रमेश महाराज आटपळे, किशोर काळकुटे, गिन्यानदेव चौधरी, बळीराम साबळे, राम भांडवलकर, बाबासाहेब दाभाडे, सोमिनाथ पवार, त्रिंबकराव घोडके, वसंतराव ढेंगळे, मकरंद इंगोले, दिपक लाटे, विनायक नन्नवरे, वसंत काटे, रामेश्वर डोंगरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी रूपाली बजगुडे, संध्या शेळके, राजेंद्र करवंदे, अविनाश पोकळे, दिलीप पोकळे, मुख्याध्यापक आर.पी. भोसले, प्रल्हाद नरवडे, राजेंद्र रांजवण, सी.आर. भोसले, सुभाष गायकवाड, डॉ.कल्याण इंगोले, धर्मराज मागदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना धट यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. या प्रवासात जे काही कमावले याची पावती मला मिळाली आहे असे सांगून वर्गमैत्रिचा उजाळा देऊन आदर्श शिक्षण संस्थेबद्दल ऋण व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना प्राचार्य थिटे म्हणाले की, शालेय पोषण विभाग धट सरांनी जबाबदारीने सांभाळला, कोणतीही काम करत असताना अतिशय नम्रपणे काम पुर्ण केलेले आहे असे सांगून पुढील आयुष्य त्यांना सुखसमाधानाचे आणि निरोगी जावो अशा शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी आर.आर.सोनवणे, सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, शिवाजी दाभाडे, लक्ष्मण दाभाडे, पांडुरंग तकीक, गजानन आढाव, मुकुंद कुलकर्णी, हरीभाऊ मेडकर आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन चंद्रशेखर जामकर यांनी केले तर प्रास्ताविक प्रा.श्रीराम जाधव यांनी केले. शेवटी रामदास घोरड यांनी उपस्थितांचे आभार मानले.



## युसूफवडगांव येथे शिवजयंती उत्साहात साजरी

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथे काल छत्रपती शिवाजी महाराज यांची शिवजयंती अतिशय थाटामाटात व उत्साहात साजरी करण्यात आली

अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते.अण्णाभाऊ साठे चौकातुन सजवलेल्या रथातुन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वरूढ पुतळ्याची मिरवणुक निघाली तद् पुर्वी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शिवमुर्तीचे पुजन करून मिरवणुकीची सुरूवात केली.ढोलताशांच्या गजरात अतिशय शांत व आनंदमयी वातावरणात मिरवणुक काढण्यात आली यावेळी मिरवणुकीचे मुख्य आकर्षक होते सातारा येथुन आलेले शिव तांडव नृत्य कला पथक या पथकाने मिरवणुकीची शोभा वाढवुन आपल्या कलाकृतीचे प्रर्दशन केले.मिरवणुक सोहळ्यात मोठ्या संख्येने गावातील युवावर्ग,महिला व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि- दिनांक-१७/०२/२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती विजय नारायण आढे रा.वसंतनगर ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या स्वतः च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| | लक्ष विजय आढे | मुलाच्या | १५/०२/२०२४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक/ /२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

# राज्यातील प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे पुनर्गठन होणार

## सहकार क्षेत्राचे बळकटीकरणाचे उद्दिष्ट की भाजपची राजकीय खेळी?

राज्यातील शेतकऱ्यांशी थेट संबंध असलेल्या 'प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था' म्हणजेच ''पॅक्स''चे पुनर्गठण करण्याची प्रक्रिया राज्य सरकारने सुरू केली आहे. त्यासाठी राज्यातील प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांसाठी स्पष्ट व कडक आर्थिक निकष लावले जाणार आहे. पहिल्या टप्यात सर्व प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांच्या आर्थिक आरोग्याची तपासणी सहकार विभाग करणार असून त्यासाठी सहकारी संस्थांच्या अप्पर आयुक्तांच्या नेतृत्वात विशेष समितीचे गठन करण्यात आले आहे. आता नव्या धोरणानुसार राज्यातील प्रत्येक महसुली गावात फक्त एक प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था राहणार आहे. एका गावात एकापेक्षा जास्त प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था असल्यास त्यांचे विलीनीकरण केले जाईल. तसेच सध्या गावपातळीवर ज्या प्राथमिक पतपुरवठा संस्था कार्यरत आहेत, त्या खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना पतपुरवठा करत आहेत, की नुसतं राजकारणासाठी कागदोपत्री संस्था चालवून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांवर आपला वर्चस्व ठेवला जात आहे, हेही तपासले जाणार आहे.



दरम्यान, हे फक्त गाव पातळीवर सहकारी कृषी पतपुरवठा सुदृढ करण्यासाठी केले जात आहे असं नाही. तर यामागे राजकीय हेतू असल्याचे नाकारता येत नाही. सध्या गाव पातळीवर बहुतांशी प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांच्या माध्यमातून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राजकीय वजन कायम आहे. मात्र, अस्तित्वात असलेल्या प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था च्या पुनर्गठनातून आणि नव्या संस्था स्थापन करून सत्ताधारी भाजप गाव पातळीवरील सहकारी चळवळीत पाय रोवण्याचा प्रयत्न करत आहे, असंही बोलले जात आहे.प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांच्या पुनर्गठनासाठी काय केले जाणार? राज्यातील प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था च्या नोंदणीचे नवे निकष लागू केले जाणार.. राज्यातील प्रत्येक महसुली गावात एक प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था राहील..(गावात एकापेक्षा जास्त पॅक राहणार नाही..) - सध्या राज्यातील २७००० पेक्षा जास्त महसुली गावांपैकी फक्त २०००० गावांमध्येच प्राथमिक पत पुरवठा संस्था कार्यरत आहे.. त्यामुळे राज्यात नवीन ७००० पेक्षा जास्त प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था स्थापन होणार..ज्या २०००० गावात प्राथमिक पत पुरवठा संस्था कार्यरत आहेत, त्या खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांसाठी काम करत आहेत की नुसतं कागदोपत्री संस्था चालवल्या जात आहे, हे ही तपासले जाणार. कार्यरत प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांची आर्थिक स्थिती तपासली जाईल..आर्थिक दृष्ट्या कमकुवत संस्था एकतर बंद केल्या जातील किंवा त्यांचे सक्षम संस्थेमध्ये विलीनीकरण केले जाईल.मात्र एका गावात फक्त एकच प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था राहील.राजकीय दृष्टिकोनातून गाव पातळीवरील प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांच्या माध्यमातून सहकार आणि राजकीय क्षेत्रात असलेला काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांचा वर्चस्व कमी करण्यासाठी भाजपकडून ही राजकीय खेळी खेळले जात असल्याचे विश्लेषकांना वाटतंय.

# कोंबड्यांच्या फायदेशीर देशी जाती



भारतातील राज्याच्या कुक्कटपालनात महाराष्ट्राचा नंबर बराच वरचा असला तरी अजून वाढत्या लोकसंख्येच्या मागणीबरोबर अर्थिक उदारीकरणामुळे निर्यातसंधीचा फायदा घेण्यासाठी मोठे ध्येय साध्य करता येणार आहे. चांगल्या कुक्कट उत्पादनासाठी चांगल्या पक्ष्यांचा पुरवठा, पुरेसे भांडवल, प्रशिक्षण याचबरोबर सकस आणि चांगल्या प्रतीचे व कमी किंमतीचे कोंबडीखाद्य मुबलक उपलब्ध असणे आणि अंडी व मांस वितरणाची व्यवस्था असणे आवश्यक आहे. देशी जाती - भारतातील सर्व कोंबड्यांच्या जाती देशी या नावाने ओळखल्या जातात. निरनिराळ्या प्रदेशातील गुणवैशष्टयानुसार कोंबड्यांना नावे दिली आहेत. जाणून घेऊयात कोंबडीच्या देशी जाती.असील : शुध्द असील पक्षी मोठा, ताठर, करारी व रूबाबदार असतो. त्याच्या चोचीपासून तळव्यापर्यंतची उंची २८ इंच असते. डोके रूंद असून त्यावर लहान वाटाण्यासारखा लालभडक तुरा असतो. चेहरा थोडा लांबट व सडपातळ असून त्यावर पिसे असतात. अंकलेश्वर : अंकलेश्वर येथून त्याच गावाचे नाव धारण करून कोंबडी प्रसिध्द झाली. अंगाने मध्यम असणारी ही कोंबडी अनिष्ट वातावरणास चांगली टक्कर देते, जडण-घडण चांगली अंडी देणाऱ्या कोंबडीसारखीच आहे.

चितगाव : ही कोंबडी भारताच्या पूर्व भागात आढळते. उंच व वजनदार असते. डोके लांबट असनू चोच लांब व पिवळ्या रंगाची असते. अंगावरची पिसे शरीराला पखडून बसलेली असतात. त्यांचा रंग पांढरा, काळा, तपकिरी, राखी अशा वेगवेगळ्या प्रकारचा असतो. बसरा : लहान व मध्यम आकाराची ही कोंबडी महाराष्ट्र आणि गुजरात सीमेवभर आढळते. शरीराची जडणघडण चांगली अंडी देणाऱ्या कोंबडीसारखी असून शरीर खोलगट आहे. ही कोंबडी आजाराला लवकर बळी पडते. कडकनाथ : या जातीचे खरे नाव कालामाती म्हणजे काळी आतडी असणारी पक्षी असे आहे, परंतु कडकनाथ या नावाने प्रसिध्द आहे. मध्य प्रदेशातील मागासलेल्या भागात या जातीची मोठ्या प्रमाणात जोपासना केली जाते. ही कोंबडी फिकट असून तांबूस रंगाची आणि फारच कमी म्हणजे वार्षिक ८० अंडी घालते. चामडी, चोच, पाय काळे असतात. ही कोंबडी आजाराला चांगली टक्कर देते. काश्मिरी : ही कोंबडी काश्मिर प्रांतात मोठ्या प्रमाणावर आढळते. पिसांचा रंग तांबडा आणि काळा असून चोच व पाय पिवळे असतात. मादीची अंडे देण्याचे प्रमाण सर्वसाधारण असून तिचे वजन दोन किलो असते. नराचे वजन दोन ते अडीच किलो असते. टेनिस नेकेड नेक : या कोंबडीच्या गळ्याभोवती पिसे नसतात, म्हणून हिला नेकेड नेक असे नाव पडले. ही कोंबडी महाराष्ट्रात सर्वत्र सापडते. हिच्या आकार व रंगामध्ये विविधता आढळते. पंजाब ब्राऊन : ही कोंबडी मुख्यत्वेकरून पंजाब, हरियाना या राज्यात सापडते. पिसाचा रंग तपकिरी असतो तर चोच व पाय पिवळे असतात. या कोंडबीच मांस चविष्ट असल्यामुळे तिचा खाण्यासाठी मोठ्या प्रमाणात वापर केला जातो.

# पांढरे वांगे देतात भरघोस उत्पन्न



राज्यातील सर्वच भागांमध्ये वांग्याची शेती मोठ्या प्रमाणात केली जाते. विशेष म्हणजे बाजारात वांग्याला नेहमीच मागणी असते. ज्यामुळे त्याला भावही चांगला मिळतो. परिणामी, शेतकऱ्यांना भाव सापडल्यास, वांग्याच्या शेतीतून मोठे आर्थिक उत्पन्न मिळते. साधारणपणे शेतकरी हिरव्या किंवा निळ्या रंगाच्या वांग्याची शेती करतात. मात्र, गेल्या काही वर्षांमध्ये अंड्यासारख्या दिसणाऱ्या पांढऱ्या वांग्याची मागणी बाजारात मोठ्या प्रमाणात वाढली आहे. इतकेच नाही तर विदेशात देखील पांढऱ्या वांग्यांना मोठी मागणी असते.

अशी होते लागवड : सर्वसाधारणपणे वांग्याची शेती खरीप, रब्बी आणि उन्हाळी अशा तिन्ही हंगामांमध्ये केली जाते. मात्र, पांढऱ्या वांग्याची शेती प्रामुख्याने मार्च किंवा एप्रिल महिन्यात आणि डिसेंबर महिन्यात केली जाऊ शकते. बाजारात हे पांढरे वांगे कमी दिसतात त्यामुळे त्यांना दरही अधिकचा मिळतो. या सफेद वांग्याच्या लागवडीसाठी सर्वप्रथम योग्य बियाण्याची निवड करून, नर्सरीमध्ये रोपे तयार करत सामान्यपणे लागवड करणे आवश्यक ठरते. हे सफेद वांगे शरीरासाठी खूप पौष्टिक असते. विशेष म्हणजे वांग्याला अधिक काळापर्यंत फळ मिळते. ज्यामुळे शेतकऱ्यांना अधिक काळ कमाई मिळण्यास मदत होते.

एवढा येतो खर्च : सर्वसाधारणपणे सफेद वांग्याच्या लागवडीसाठी शेतकऱ्यांना हेक्टरी दोन लाखांपर्यंतचा खर्च येऊ शकतो. यात ठिबक, मल्चिंग असा सर्व प्राथमिक खर्च धरला जाऊ शकतो. ठिबक व्यवस्था असेल तर सफेद वांग्याच्या शेतीला अधिक पाण्याचीही आवश्यकता नसते. त्यानंतर शेतकरी आपल्याकडील सेंद्रिय खते किंवा कंपोस्ट खते वापरून या पिकाचा उत्पादन खर्च देखील कमी करू शकतात. याशिवाय शेतकरी सफेद वांग्याला सेंद्रिय निंबोळी अर्क तयार करून कीड नियंत्रण करू शकतात. सफेद वांग्याचे पीक हे ;लागवडीनंतर ७० ते ९० दिवसांत तोडणीला येते.

असे मिळेल उत्पादन/उत्पन्न : शेतकऱ्यांनी सफेद वांग्याच्या लागवडीसाठी योग्य वाणाची निवड, योग्य पीक व्यवस्थापन तसेच वेळोवेळी आवश्यक तितकेच पाणी दिले. तर शेतकऱ्यांना हेक्टरी १०० टन वांग्याचे उत्पादन सहज मिळू शकते. बाजारात वांग्याला कमीत कमी १० ते १५ रुपये प्रति किलोचा दर सहज मिळतो. ज्यामुळे शेतकऱ्यांना एक हेक्टर शेतीतून १० ते १५ लाखांची कमाई सहज मिळू शकते. अर्थात एखाद्या शेतकऱ्याने पांढऱ्या वांग्याची लागवड बिघाभर शेतीत केल्यास, अशा शेतकऱ्यांना बिघ्यात २ लाख उत्पन्न सहज मिळू शकते. सामान्य वांग्याची शेतीची आणि पांढऱ्या वांग्याची शेती जवळपास सारखीच असते.

अधिक पौष्टिक गुणधर्म : भारतात प्रामुख्याने पांढऱ्या वांग्याची सर्वाधिक लागवड जम्मू-काश्मीर राज्यामध्ये होते. इतर राज्यामध्ये कमी-अधिक प्रमाणात पांढऱ्या वांग्याचे उत्पादन होते. मात्र इतर राज्यामध्ये सफेद वांग्याची लागवड ही फारच नगण्य स्वरूपात होते. हिरव्या, निळ्या रंगाच्या वांग्यापेक्षा या सफेद वांग्यामध्ये अधिक पौष्टिक गुणधर्म आढळतात, त्यामुळेच बाजारात त्याला मागणीही जास्त असते.

# उन्हाळ्यात अशी घ्या कोंबड्यांची काळजी



उन्हाळ्यात कोंबड्यांची अधिक काळजी घ्यावी लागते. शिवाय या हंगामात त्यांच्या आहाराकडे देखील विशेष लक्ष देणे अत्यंत गरजेचे असते. कारण उन्हाळ्यात कोंबड्यांना संसर्गजनीत रोग होण्याचा धोका जास्त असतो. पोल्ट्री व्यवसाय केवळ अंड्यांच्या उत्पादनासाठीच केला जात नाही, तर त्याच्या चिकनलाही बाजारात मोठी मागणी असते. त्यामुळे उन्हाळ्यात योग्य काळजी व आहार न मिळाल्याने अनेक कोंबड्यांचा अकाली मृत्यू होतो. त्यामुळे पोल्ट्री उत्पादकांना मोठे आर्थिक भुर्दंड सहन करावे लागते.

उष्माघातची लक्षणे : कुक्कुटपालन व्यवसायातील तज्ज्ञांच्या मते, उन्हाळ्यात कोंबड्यांना अधिक त्रास सहन करावा लागतो. त्यांची अंडी घालण्याची क्षमता कमी होऊ लागते. एवढेच नाही तर उन्हाळ्यात कोंबड्यांच्या मृत्यूचे प्रमाणही वाढते. तापमान जेव्हा ३९ अंश सेंटीग्रेडपेक्षा जास्त असते तेव्हा कोंबड्यांना खूप त्रास होतो. या तापमानात कोंबड्याना उष्माघात येण्याचा धोका अधिक वाढतो. उष्माघातात कोंबडीची चोच फुगते, अशक्त होतात, चेंगराचेंगरी सुरू होते आणि अर्धांगवायू होऊन त्यांचा मृत्यू होतो.

प्रोटीनयुक्त आहाराची गरज : उन्हाळ्यात कोंबड्यांना प्रोटीनयुक्त आहार आवश्यक उन्हाळ्यात कोंबड्या कमी धान्य खातात. त्याची भूक कमी होते. त्यामुळे या ऋतूमध्ये कोंबड्यांना अन्न देताना विशेष काळजी घ्यावी लागते. उन्हाळ्यात कोंबडीच्या आहारात प्रथिने, जीवनसत्त्वे आणि खनिजे यांचे प्रमाण जास्त असायला हवे जेणेकरून कमी खाल्ल्यानंतरही कोंबडीला आवश्यक ते सर्व घटक मिळू शकतील आणि कोंबड्या निरोगी राहतील. त्याच वेळी, अंड्याचे शेल पातळ होऊ नये म्हणून आहारात कॅल्शियमचे प्रमाण वाढवण्याचा सल्ला दिला जातो. यासाठी ओस्टो कॅल्शियम लिक्विड पाण्यात देता येऊ शकते.

तज्ज्ञांच्या मते, कोंबड्यांना थंडीच्या काळात धान्य खायला आवडते. त्यामुळे दुपारी कोंबडीना लाईटचा प्रकाश देण्याव्यतिरिक्त, सकाळी थंड वातावरणात जास्त प्रकाश द्या जेणेकरून कोंबड्या अन्नाचा पुरेपूर वापर करू शकतील. साधारणपणे, कोंबड्या ६० अंश ते ८० अंश तापमानाला प्राधान्य देतात कारण या तापमानात कोंबडीचा आहार आणि अंडी उत्पादनाचा दर जास्त असतो. जास्त तापमानामुळे, कोंबडी कमी खातात आणि कमी अंडी घालतात, ज्यामुळे पोल्ट्री फार्मर्सचे नुकसान होते. त्यामुळे कोंबड्यांच्या आहाराच्या वेळेचीही काळजी घेतली पाहिजे.

पाण्याची व्यवस्था : उन्हाळ्यात कोंबड्यांना अधिक पाणी लागतं असते. कोंबडयांना उन्हाळ्यात दुपटीने पाणी लागते. यासाठी पोल्ट्री फार्ममध्ये नेहमी स्वच्छ आणि थंड पाण्याची व्यवस्था केली पाहिजे. त्याचबरोबर प्लास्टिक किंवा झिंकपासून बनवलेले पाण्याचे भांडे ठेवू नका. त्याऐवजी, मातीचे भांडे वापरावे जेणेकरुन त्यात पाणी जास्त काळ थंड राहील. उन्हाळ्यात, कोंबडी फार्मच्या खालील पृष्ठभागाची जाडी २ इंचांपेक्षा जास्त नसावी. जर लिटर जुने झाले असेल तर ते काढून टाका आणि नवीन लिटर वापरा. असे केल्याने कोंबड्यांमध्ये संसर्ग पसरण्याची शक्यता कमी होईल.

उष्माघातातील काळजी : पोल्ट्री फार्मचे छत पांढऱ्या रंगाने रंगवावे, जेणेकरून सूर्याची किरणे छतावर पडून परत जातील. एस्बेस्टोस शीट्स छतावर देखील स्थापित केल्या जाऊ शकतात, यामुळे छताला जास्त गरम होण्यापासून रोखता येते. खिडक्यांपासून ३-५ फूट अंतरावर गोणपाटाचे पडदे लावून त्यावर पाणी शिंपडून कोंबड्यांचे फार्म थंड करता येते. फॉगर्सची सुविधा उपलब्ध असल्यास पोल्ट्री हाऊसचे तापमानही कमी होऊ शकते. याशिवाय पंखे आणि कुलरचा वापर करून पोल्ट्री हाउसचे तापमानही नियंत्रणात ठेवता येते. अशा पद्धतीने काळजी घेवून काही उपाययोजना केल्यास उन्हाळ्यात कोंबड्यांना होणारा त्रास कमी होऊन मरतुकेचे प्रमाण कमी करता येते. परिणामी कोंबडी पालन आर्थिक पातळीवर यशस्वी होते.




### जागतिक दिवस:
### जागतिक नागरी संरक्षण दिवस
### बोस्निया व हेर्झेगोविनाचा स्वातंत्र्यदिन

### महत्वाच्या घटना

१५६५ : रिओ डी जानिरो शहराची स्थापना झाली.
१८१८ : सिंहगड किल्ला इंग्रजांनी ताब्यात घेतला.
१८७२ : 'यलो स्टोन नॅशनल पार्क' या जगातील पहिल्या राष्ट्रीय उद्यानाची स्थापना झाली.
१८९३ : अभियंते निकोला टेस्ला यांनी पहिल्या रेडिओ चे प्रात्यक्षिक दाखवले.
१८९६ : हेन्री बॅक्करल अणुकिरणोत्सर्जीचे किरणे शोधले.
१९०७ : टाटा आर्यन अ‍ॅन्ड स्टील कंपनीची स्थापना
१९१९ : रॉलट अ‍ॅक्ट निषेधार्थ महात्मा गांधी यांनी सत्याग्रहाला रारंभ केला.
१९२३ : आजच्या दिवशी ग्रीसांनी ग्रेगोरियन कॅलेंडर ला स्वीकारले.
१९२७ : रत्नागिरीस गांधीजींनी सावरकरांची भेट घेउन चर्चा केली.
१९३६ : अमेरिकेतील महाकाय 'हूव्हर धरण' बांधून पूर्ण झाले.
१९४६ : 'बँक ऑफ इंग्लंड'चे राष्ट्रीयीकरण झाले.
१९४७ : आंतरराष्ट्रीय नाणे निधिच्या कामकाजास सुरूवात झाली.
१९४८ : गुवाहाटी उच्च न्यायालयाची स्थापना
१९५४ : प्रशांत महासागरातील बिकिनी अटोल येथे अमेरिकेने हायड्रोजन बॉम्बची दुसरी चाचणी घेतली. हा स्फोट हिरोशिमाच्या स्फोटापेक्षा ६०० पट जास्त शक्तिशाली होता. तो दिवसासुद्धा १५० किलोमीटर पेक्षा जास्त दूरवर दिसला. या स्फोटामुळे आसपासच्या भागात प्रचंड प्रमाणात किरणोत्सर्ग झाला.
१९५८ : कोयना जलविद्युत प्रकल्पाच्या उभारणीस सुरुवात
१९६१ : अमेरिकेचे अध्यक्ष जॉन एफ केनेडी यांनी पीस कॉर्पस स्थापन करते.
१९६१ : युगांडा मध्ये लोकशाही गणतंत्र सुरु होऊन पहिल्या निवडणुकी झाल्या.
१९९२ : बोस्निया व हेर्झेगोविनाला युगोस्लाव्हियापासून स्वातंत्र्य मिळाले.
१९९८ : दाक्षिणात्य गायिका एम. एस. सुब्बलक्ष्मी यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान करण्यात आला.
२००९ : राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांनी नवीन चावला यांना देशाचे निवडणूक आयुक्त बनविण्याची घोषणा केली.
२०१० : आजच्या दिवशी भारताच्या हॉकी संघाने पाकिस्तान च्या संघाला ४-१ ने हरविली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१९१७ : प्रसिद्ध हिंदी करतार सिंह दुग्गल यांचा जन्म.
१९१९ : भारतीय अर्थशास्त्रज्ञ पृथ्वी नाथ धर यांचा जन्म.
१९२२ : यित्झॅक राबिन - इस्त्रायलचे ५ वे पंतप्रधान, संरक्षणमंत्री आणि नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: ४ नोव्हेंबर १९९५)
१९२२ : महाराष्ट्र भूषण पुरस्कार लाभणारे आधुनिक महामानव डॉ. नारायण विष्णू तथा नानासाहेब धर्माधिकारी यांचा अलिबाग, रायगड येथे जन्म.
१९३० : राम प्रसाद गोएंका - उद्योगपती (मृत्यू: १४ एप्रिल २०१३)
१९४४ : पश्चिम बंगाल चे माजी मुख्यमंत्री बुद्धदेव भट्टाचार्य यांचा जन्म.
१९५१ : बिहार चे मुख्यमंत्री नितीश कुमार यांचा जन्म.
१९६८ : सलील अंकोला - क्रिकेटपटू
१९६८ : आजच्या दिवशी भारतीय वेटलिफ्टर कुंजारानी देवी यांचा जन्म.
१९७७ : पाकिस्तानी क्रिकेट खेळाडू शहीद आफ्रिदी यांचा जन्म.
१९८० : शाहिद अफ्रिदी - पाकिस्तानी क्रिकेटपटू
१९८३ : भारतीय बॉक्सर मेरी कॉम यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९५५ : नारायण सदाशिव मराठे तथा 'केवलानंद सरस्वती' - महाराष्ट्रातील धर्मसुधारणावादी श्रेष्ठ संस्कृत पंडित, संस्कृतमीमांसाकोशाचे संपादक (जन्म: ८ डिसेंबर १८७७)
१९८८ : हिंदी भाषेतील कवी सोहनलाल द्विवेदी यांचे निधन.
१९८९ : वसंतदादा पाटील - महाराष्ट्राचे ५ वे व ९ वे मुख्यमंत्री, सहकारी साखर कारखानदारीचे आधारस्तंभ (जन्म: १३ नोव्हेंबर १९१७)
१९९४ : निर्माते, दिग्दर्शक मनमोहन देसाई यांनी आत्महत्या केली (जन्म: २६ फेब्रुवारी १९३७)
१९९४ : महाराष्ट्राचे शिल्पकार वसंतराव दादा पाटील यांचे निधन
१९९९ : दत्तात्रयशास्त्री धुंडिराज तथा 'दत्तमहाराज' कवीश्वर - वेदविद्येचे आणि संस्कृतचे गाढे अभ्यासक, वेदांती पंडित (जन्म: १३ फेब्रुवारी १९१०) गौरी देशपांडे कादंबरीकार, लघुकथालेखिका आणि कवयित्री-..गौरी देशपांडे कादंबरीकार, लघुकथालेखिका आणि कवयित्री
२००३ : गौरी देशपांडे - कादंबरीकार, लघुकथालेखिका आणि कवयित्री (जन्म: ११ फेब्रुवारी १९४२)
२०१७ : आजच्या दिवशी विनोदी लेखक तारक मेहता यांचे निधन.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान

## अधिकारी-कर्मचाऱ्यांनी समन्वयाने कामे करावीत-जिल्हाधिकारी

जालना। प्रतिनिधी

जालना जिल्ह्यात दि.७ मार्च ते १५ मे २०२६ या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबीर आयोजित करण्यात आले आहेत. या बैठकीमध्ये एक अधिकारी झोप घेत असल्याचे दिसून येत आहे. ही शिबिरे हे प्रत्येक तालुक्यातील महसूल मंडळ, नगर परिषद व नगर पंचायतीस्तरावर घेतली जाणार आहेत. तरी महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख आणि गतिमान करण्यासाठी सर्व संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी समन्वयाने कामे करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिल्या आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबीर अभियान टप्पा-१ अंतर्गत व्हिडीओ कॉन्फर्सिंगद्वारे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत त्या बोलत होत्या. या बैठकीस अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी



शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी मनिषा देशपांडे, सहायक जिल्हाधिकारी बी.सर्वनन यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान (टप्पा-१) अंतर्गत समाधान शिबिरांच्या पूर्वतयारीचा आढावा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी नुकताच घेतला आहे. या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित कामे आणि नागरिकांच्या तक्रारी एकाच ठिकाणी निकाली काढणे हे आहे. तरी अधिकाधिक नागरिकांना शिबिराचा लाभ घेता यावा यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबीराची जनजागृती सर्व माध्यामाद्वारे करण्यात यावी. तसेच छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबीराचे सुक्ष्म नियोजन करावे, अशा सुचनाही त्यांनी यावेळी दिल्या. समाधान शिबिरात भोगवटदार वर्ग-२ ते वर्ग-१ परावर्तन पुर्ण करुन सातबारा अद्ययावत देणे, जीवंत सातबारा अंतर्गत प्रलंबित नोंदी दुरुस्त करणे, सामाजिक योजनांचे अर्ज मंजूर करुन शिबिरात वितरण करणे, पाणंद रस्ते व सर्वांसाठी घरे प्रकरणे निकाली काढुन आदेश/पट्टे वाटप करणे, प्रलंबित व विवादग्रस्त फेरफार निकाली काढणे, अभिलेख दुरुस्ती हेल्प डेस्क सुरु करणे, अकृषिक सुधारणाकरणेबाबत मार्गदर्शन करणे, लोकसेवा हक्क कायद्यानुसार प्रमाणपत्र अर्ज स्विकारणे व वितरण करणे, डिजीटल सातबारा, व नवीन महसूल तरतुदींची जनजागृती करणे, कमी जास्त पत्रके अद्ययावत करणे, एक खिडकी सुविधेद्वारे ई-मोजणी, ॲग्रीस्टॅक, पीएम किसान व तक्रार निवारण सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. अशी माहिती ही यावेळी देण्यात आली. या बैठकीस सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार व्हिडीओ कॉन्फर्सिंगद्वारे उपस्थित होते.

# ग्रामीण संस्कृतीचा जिवंत वारसा म्हणजे बैलगाडा शर्यत



मंठा। प्रतिनिधी

तालुक्यातील आर्डा (खारी) येथे महाशिवरात्री निमित्त आयोजित करण्यात आलेली भव्य बैलगाडा शर्यत अत्यंत अटीतटीच्या सामन्यांनी आणि थरारक वातावरणात संपन्न झाली. या शर्यतीमध्ये जिल्ह्यासह राज्यातील नामांकित अडीचशेहून अधिक बैलगाडा मालकांनी सहभाग नोंदवला होता. २ लाख ५६ हजार रुपयांच्या एकूण बक्षिसांच्या या जंगी मैदानात बैलगाडा शौकीनांच्या डोळ्यांचे पारणे फिटले.

या शर्यतीचे उद्घाटन शिवसेना जिल्हाप्रमुख ए. जे. पाटील बोराडे, शिवसेना नेते प्रल्हादराव बोराडे व तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या हस्ते झाले.या शर्यतीत प्रथम बक्षीस ७१,००० जिल्हाप्रमुख ए. जे.पाटील बोराडे, तर द्वितीय बक्षीस ५१,००० उदयसिंह बोराडे यांच्या तर्फे, तर तृतीय बक्षीस ४१,००० चतुर्थ बक्षीस राजेभाऊ कव्हळे, पाचवे बक्षीस ३१,००० योगेश पाटील अवचार, तसेच रतन कळणे, दिलीपराव कव्हले, अमोल ढेंगळे, अक्षय ढेंगळे, दत्तराव चव्हाण, प्रदिप अवचार यांच्यातर्फे आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली होती.

शर्यतीच्या ठिकाणी येणाऱ्या प्रत्येक बैलगाडा मालकाची आणि प्रेक्षकांची विशेष काळजी घेण्यात आली.शर्यतीदरम्यान सर्व नियमांचे काटेकोर पालन करण्यात आले. विजेत्या बैलगाडा मालकांनी गुलालाची उधळण करत आपल्या विजयाचा आनंद साजरा केला. याप्रसंगी उपजिल्हाप्रमुख किसनरावजी मोरे, योगेश पाटील अवचार, तुळशीरामजी कुहिरे, उपतालुकाप्रमुख रामराव वरकड,पप्पुजी दायमा,भगवानराव गायकवाड,अमोल विरकर, रतन कळणे, विकास गिराम, गोपी डेंगळे तसेच पंचक्रोशीतील बैलगाडा प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# व्यसनमुक्ती अभियानासाठी डॉ. कृष्णा भावले सन्मानित

## राज्यस्तरीय वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कार



जालना। प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाचा आरोग्य सेवेसाठी सामाजिक बांधिलकी आणि वैद्यकीय सेवेच्या क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या वैद्यकीय सेवेसाठी महाराष्ट्र शासनातर्फे दिला जाणारा वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न - २०२४-२५ राज्यस्तरीय पुरस्कार मुंबई येथे मा.आरोग्य मंत्री श्री प्रकाश आबिटकर आणि राज्य आरोग्य मंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते १ लाख रुपये आणि सन्मान चिन्ह पुरस्कार डॉ कृष्णा रामचंद्र भावले यांना प्रदान करण्यात आला. व्यसनमुक्ती कार्यासाठी दिला जाणारा हा मानाचा सन्मान असून, २२ फेब्रुवारी २०२६ रोजी, मुंबईतल्या यशवंतराव चव्हाण सभागृहात सकाळी ११ वाजता देण्यात आला.

डॉ कृष्णा भावले २००९ पासून गरीब, गरजू, ग्रामीण आणि विशेषत आदिवासी भागातील नंदुरबार, धुळे जिल्ह्यातील मध्य प्रदेश- महाराष्ट्र सीमावर्ती सातपुडा आदिवासी क्षेत्रात ''दारूमुक्त घर -दारूमुक्त गाव अभियान '' मोहीम व्यसनमुक्ती साठी २२ हजार आदिवासी परिवारासाठी व्यसनमुक्ती उपचार, प्रसार-जनजागृती कार्यक्रम आदिवासी गाव आणि पाड्यात आदिवासी परिवारा साठी मोफत उपचार सेवा देत आहेत, आदिवासी युवकांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी आदिवासी शाळा मधुन विद्यार्थ्यांना,व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी फिल्म, रॅली,निबंध स्पर्धा आदि जनजागृती च कार्य करत आहे. विशेषत या मोहिमेतून २ हजार पेक्षा जास्त आदिवासी महिलांना व्यसनमुक्ती मार्गावर आणले असून ग्रामीण डोंगराळ भाग आणि बंजारा गाव तांडे कन्नड दुर्गमडोंगराळ भाग-गाव या ठिकाणी गरजू परिवाराना व्यसनमुक्ती साठी नाममात्र तर गरीब परिवाराना मोफत उपचार देत आहेत, शालेय व कॉलेज युवकांसाठी व्यसनमुक्ती जनजागृती साठी रॅली, समुपदेशन कार्यक्रम राबवतात. दीड लाख परिवार आज पर्यंत या अभियानाला जोडले गेले असून अनेक परिवार व्यसनमुक्त होऊन नवीन आयुष्य जगत आहे, आदिवासी परिवाराच्या निशुल्क निवासी उपचारासाठी २५ बेडच व्यसनमुक्ती केंद्र सातपुडा आदिवासी क्षेत्र उभ केल जात आहे . तसेच छत्रपती संभाजी नगर येथे गरजू परिवारा साठी उपचार मोहीम राबविली जात आहे. या व्यसनमुक्ती अभियान मोहिमेला मोठ सहकार्य अधिकारी मा.श्री समीर वानखेडे यांचे लाभत आहे विशेषत डॉ भावले आणि समीर वानखेडे मिशन मुंबई व्यसनमुक्ती उपचार जनजागृती कार्यक्रम राबवित आहे. दीड लाख गरजू परिवारा सोबत व्यसनमुक्ती कार्यासाठी आणि विशेषत २२ हजार आदिवासी परिवारासाठी व्यसनमुक्ती च्या कार्याची सामजिक दखल महाराष्ट्र शासनाने घेऊन आरोग्य रत्न पुरस्काराने सन्मानित केले हा केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून, हजारो व्यसनमुक्त कुटुंबांच्या नवजीवनाचा उत्सव आहे.तसेच समाजपरिवर्तनाच्या एका प्रेरणादायी चळवळीचा खऱ्या अर्थाने हा सन्मान आहे.

# बाजार समितीच्या समोर गतिरोधक बसण्यासाठी कुणीच दखल घेईना-सतीश पंच

जालना। प्रतिनिधी

मराठवाड्यामध्ये नंबर एक वर असलेली जालना कृषी उत्पन्न बाजार समितीच्या दोन्ही प्रवेशद्वारासमोर महामार्गावर वाहनांचा वेग प्रचंड असल्याने दररोज ४ ते ५ अपघात घडत आहेत. हे अपघात रोखण्यासाठी तातडीने गतिरोधक बसवावेत, अशी आग्रही मागणी व्यापारी महासंघ, जिल्हा जालनाच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांसह संबंधित विभागांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली होती. मात्र अद्याप पर्यंत कोणीच दखल न घेतल्याने महासंघाचे अध्यक्ष तथा कॅटचे राज्य उपाध्यक्ष सतीश पंच यांनी आज शुक्रवार दि. २७ फेब्रुवारी रोजी झालेल्या जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीत या मुद्द्यावर आवाज उठविला. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी याकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी त्यांनी केली.

जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक आज साहेब जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, परिषदेच्या सचिव श्रीमती चौधर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या



मुद्द्याकडे लक्ष वेधताना सतीश पंच यांनी म्हटले आहे की, यापूर्वी तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांसह विद्यमान जिल्हाधिकारी, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग आदी विभागांकडे पत्रव्यवहार करून निवेदने देण्यात आलेली आहेत. उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने याबाबत राष्ट्रीय महामार्ग विभागाला अहवाल देऊन, तात्काळ दाखल घेण्याबाबत सुचित केलेले आहे. मात्र, अद्याप कोणीच दखल घेतलेली नाही. जालना- बुलढाणा-नांदेड बायपासवर ही बाजार समिती असल्याने येथे ट्रक, टेम्पो, बसेस आणि लोडिंग गाड्यांची सतत मोठी वर्दळ असते. बाजार समितीच्या दोन्ही मुख्य प्रवेशद्वारांसमोर गतिरोधक नसल्याने वाहने भरधाव वेगाने जातात. दुभाजकांमुळे समोरून येणारी वाहने दिसत नाहीत, परिणामी येथे दररोज अपघात होत आहेत. यापूर्वी राष्ट्रीय महामार्ग विभाग आणि बाजार समिती प्रशासनाकडे वारंवार पत्रव्यवहार करूनही अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही. व्यापारी, शेतकरी, कामगार आणि खरेदीदारांच्या सुरक्षिततेसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी या विषयात विशेष लक्ष घालून संबंधित विभागाला तातडीने गतिरोधक बसवण्याचे आदेश द्यावेत, अशी विनंती व्यापारी कॅटचे राज्य उपाध्यक्ष सतीश पंच यांनी या निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनावर मराठवाडा अध्यक्ष अध्यक्ष हस्तीमल बंब आणि कार्याध्यक्ष दिपक भुरेवाल यांचीही नावे आहेत.

# तहसीलदार रंगनाथ मेंडके यांचा सेवानिवृत्तीनिमित्त जिल्हाधिकारी यांच्या हस्ते गौरव



जालना। प्रतिनिधी

जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल शाखेत कार्यरत असलेले तहसीलदार रंगनाथ मेंडके हे आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर नियत वयोमानानुसार आज सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात एका विशेष निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी तहसीलदार श्री.मेंडके यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला आणि त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी मनिषा देशपांडे, सहायक जिल्हाधिकारी बी. यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागाचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मत्स्योदरी महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा

अंबड। प्रतिनिधी

कविवर्य कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस दिमानिने मिरा आज शुक्रवारी (ता. २७) अंबड येथील मत्स्योदरी महाविद्यालयात मराठी ग्रंथ प्रदर्शन व अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




या ग्रंथ प्रदर्शनाचे उदघाटन केल्यानंतर प्राचार्य डॉ. मिलिंद पंडित यांनी कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. याप्रसंगी ते म्हणाले की, मराठी भाषा ही महाराष्ट्राची राजभाषा असून, आपण आपल्या मराठी भाषेला जपले पाहिजे. मराठीतून लेखन, वाचन, भाषण करणे ही मराठी भाषेवर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाची जबाबदारी असून, भाषाभिमान असावा पण तीचा दुराभिमान असू नये, असते याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. ज्ञानेश्वर उबाळे, स्टाफ सेक्रेटरी डॉ. राम रौनेकर, उपसंपादक महेश कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. पांडुरंग काळे, डॉ. दत्ता घोगरे, डॉ. प्रशांत तौर, डॉ. रविराज कटारे, डॉ. रवींद्र पाथरे, प्रा. दिपक राखुंडे, प्रा. रवींद्र पैठणे, प्रा. जानकी कुर्तडीकर, डॉ. लक्ष्मण गादगे, प्रा. संपत पवार, डॉ. सुनील नजान, बंडुसाहेब कनके, डॉ. मनीषा गायकवाड, प्रा. विशाल खरात, प्रा. पुनम जामधरे, डॉ. रामकिसन बेलनूर, डॉ. कृष्णा नागवे, प्रा. रतन गांगोडे, प्रा. स्नेहल सुळे, प्रा. संध्या कोटंबे, अरुण लांडगे, जनार्दन आडे यांच्यासह विद्यार्थी आणि विद्यार्थीनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# जय माता दी कपड्याच्या दुकानांमध्ये २१ तलवारी जप्त

जालना। प्रतिनिधी

जालना शहरातील महावीर चौकात जय माता दी कापड दुकानावर सदर बाजार पोलिसांच्या डीबी पथकाने धडक कारवाई करत तब्बल २५,९०० रुपयांच्या २१ धारदार तलवारी जप्त केल्या. या कारवाईमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे. दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी सुमारे १ वाजेच्या सुमारास पोलीस ठाणे सदर बाजार पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की, महावीर चौकातील जय मातादी मेन्स वेअर या कापड दुकानात एक इसम तलवारी बाळगत आहे. माहितीची खातरजमा करून त्यांनी तात्काळ ही बाब पोलीस निरीक्षक संदीप भारती यांना कळवली. वरिष्ठांच्या

आदेश व मार्गदर्शनाखाली दुपारी १.१५ वाजता दोन पंचांसह पोलिसांनी संबंधित दुकानावर छापा टाकला. दुकानात संशयित इसम आढळून आला. चौकशीअंती त्याने आपले नाव मनिष दिलीपकुमार निहलानी (वय ४३, रा. शिव अपार्टमेंट, अजिंठा नगर, जालना) असे सांगितले. प्राथमिक चौकशीत उडवाउडवीची उत्तरे देणाऱ्या निहलानी याची



अधिक विश्वासात घेऊन सखोल तपासणी करण्यात आली. पंचांसमक्ष दुकानाची झडती घेतली असता तिसऱ्या मजल्यावर चॉकलेटी, लाल व पांढऱ्या रंगाच्या कव्हरमध्ये लपवून ठेवलेल्या १३ मोठ्या व ८ लहान अशा एकूण २१ तलवारी आढळून आल्या. जप्त तलवारींची एकूण किंमत २५,९०० रुपये असल्याचे समोर आले. सदर प्रकरणी आरोपीविरुद्ध पोलीस ठाणे सदर बाजार येथे भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ तसेच कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही धडक कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अप्पर पोलीस अधीक्षक आयूष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पोलीस निरीक्षक संदीप भारती यांच्या नेतृत्वात पार पडली. डीबी पथकाचे प्रमुख पोउपनि सचिन सानप यांच्यासह रामप्रसाद रंगे, पोलीस पथकाने ही कारवाई यशस्वी केली. शहरात अवैध शस्त्रसाठ्याविरोधात पोलिसांनी आक्रम क भूमिका घेतल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले असून, अशा बेकायदेशीर कृत्यांवर कठोर कारवाईचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

# जामखेडमधील अतिक्रमण हटवण्याच्या कारवाईला वेग, दुसरी नोटीस बजावली

जामखेड। प्रतिनिधी

जामखेड शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर जामखेड नगरपरिषद यांनी अतिक्रमणधारकांना दुसरी नोटीस बजावून कारवाईला वेग दिला आहे. बस स्थानकापासून शासकीय दूध संघापर्यंत दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असून अवघा एक किलोमीटरचा रस्ता पार करण्यासाठी नागरिकांना तब्बल दोन तासांचा वेळ लागत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.

जामखेड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ५४८-डी मार्गावरील इतर ठिकाणची अतिक्रमणे यापूर्वी हटवण्यात आली असली, तरी शहरातील अतिक्रमणे अद्याप कायम असल्याने प्रशासनावर टीका होत होती. सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार यांनी केलेल्या उपोषणानंतर प्रशासनाने हालचालींना वेग आला आहे. महामार्गाची शासकीय हद्द रस्त्याच्या मध्यापासून दोन्ही बाजूस प्रत्येकी १५ मीटर (५० फूट) इतकी आहे. या हद्दीत उभारलेली नियमबाह्य बांधकामे, टपऱ्या व इतर अतिक्रमणे प्रस्तावित रस्ते रुंदीकरणास अडथळा ठरत आहेत. परिणामी शहरातील विविध विकासकामे रखडली असून उजनी धरणातून होणारी पाणीपुरवठा योजना देखील ठप्प असल्याची नागरिकांची तक्रार आहे.

# पाथर्डीत क्रीडा संकुल उभारणार आ.मोनिका राजळे

## क्रीडा संकुलासाठी २५ कोटी निधीची तरतूद

पाथर्डी । प्रतिनिधी



पाथर्डी शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने व खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ मिळावे यासाठी आमदार मोनिका राजळे यांनी पुढाकार घेतला असून मुंबई येथे चालू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पाथर्डी शहरात भव्य असे क्रीडा संकुल उभारण्यात येणार असल्याची माहिती दिली आहे या संदर्भात राज्य शासनाकडून पाथर्डी शहरात दहा एकर जागा मंजूर झाली असून या दहा एकर जागेत भव्य स्वरूपाचे क्रीडा संकुल उभारले जाणार आहे यासाठी तब्बल २५ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करणार असल्याची माहिती आमदार मोनिका राजळे यांनी दिली लवकरच या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री तथा क्रीडा व सांस्कृतिक मंत्री सुनेत्रा अजित पवार यांची भेट घेऊन क्रीडा संकुल उभारण्याच्या कायदेशीर परवानगी जागेचे हस्तांतरण या कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लवकरच क्रीडा संकुल निर्माण कामास प्रारंभ होणार आहे यामुळे पाथर्डी शहरातील भव्य क्रीडा संकुलनाची ऐतिहासिक वास्तू पाथर्डी शहराच्या विकासात आणि वैभववात भर टाकनार असून यामुळे पाथर्डीकर व क्रीडाप्रेमींच्या अपेक्षा पूर्ण होणार आहेत.

# चांदणेवस्तीत छापा : साडेतीन लाखांचा गुटखा जप्त

## स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरातील पेठ बीड भागातील चांदणे वस्ती परिसरामध्ये एका पत्र्याच्या शेडमध्ये शासनाने प्रतिबंधित केलेला अवैध गुटखा साठवून ठेवल्याची माहिती गुन्हे अन्वेषण शाखेला मिळाल्यावरून या ठिकाणी धाड टाकून जवळपास साडेतीन लाखाचा गुटखा पोलिसांनी जप्त केला. याप्रकरणी फिरोज दस्तगीर तांबोळी याच्याविरुद्ध पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे पोलीस वारंवार अवैध गुटख्याच्या ठिकाणी झाडे मारतात मात्र बीड मधला गुटखा काही केल्या बंद होत नाही.**

पोलीस अधीक्षकांनी जिल्ह्यातील अवैध धंद्याचे समुळ उच्चटन करणे बाबतचे आदेश दिलेले आहेत. पोलीस निरीक्षक स्था.गु.शा., बीड यांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, चांदणेवस्ती पेठ बीड येथील एका पत्र्याच्या शेडमध्ये फेरोज दस्तगीर तांबोळी रा. चांदणे वस्ती बीड याने बेकायदेशिररित्या विविध कंपनीचा गुटखा विक्री करण्यासाठी साठवुन ठेवलेला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, यांच्या आदेशाने पोउपनि श्रीराम खटावकर, पोह/



राहुल शिंदे, पोह/युनुस बागवान, पोह/गोविंद राख, मपोह/स्वाती मुंडे, पोअ/अशपाक सय्यद, पोअ/मनोज परजणे, चालक पोह/नितीन वडमारे सर्व नेमणुक स्थागुशा बीड असेनी मिळुन मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी जाऊन दि.२८.०२.२०२६ रोजी ०८.४५ वाजता छापा मारला असता सदर ठिकाणी असलेला फेरोज दस्तगीर तांबोळी रा. चांदणेवस्ती बीड जि.बीड हा रेड पार्टीस पाहुन पळुन गेला. त्याच्या घराच्या बाजुच्या पत्र्याच्या शेडमध्ये व घरामध्ये विविध कंपनीचा महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा किमंती अंदाजे ३,५९,३८८/- रूपयाचा माल विक्री करण्यासाठी साठवुन ठेवलेला असतांना मिळुन आला. म्हणुन त्याचे विरूध्द पोलीस ठाणे पेठ बीड येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस अधीक्षक सो बीड नवनीत काँवत,अप्पर पोलीस अधीक्षक बीड, सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, यांच्या आदेशाने पोउपनि श्रीराम खटावकर, पोह / राहुल शिंदे, पोह/युनुस बागवान, पोह/गोविंद राख, मपोह/स्वाती मुंडे, पोअ/अशपाक सय्यद, पोअ/मनोज परजणे, चालक पोह/नितीन वडमारे यांनी मिळुन केली आहे.

# गोरक्षनाथ टेकडी येथे सोमवारी नाना महाराज कदम यांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २८ व्या वर्षातील



सहाव्या व्या पुण्यतिथी फाल्गुन शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. नाना महाराज कदम नेकनूर यांचे सोमवार दिनांक २ मार्च २०२६ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी ढेकणमोहा ता.जि.बीड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

# बैलगाडीला ट्रकची जोरदार धडक, महिला ठार

वडवणी । प्रतिनिधी

कर्नाटक राज्यातील महात्मा गांधी सहकारी साखर कारखान्यावरील ऊस वाहतूक करणाऱ्या बैलगाडीला अज्ञात ट्रकने जोराची धडक दिली. ही घटना काल सायं. ४.३० वाजण्याच्या सुमारास कारखान्यापासून अवघ्या पाचशे मीटरवर घडली असून या अपघातामध्ये अंदाजे ४८ वर्षीय ऊसतोड कामगार महिलेचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला आहे.



वडवणी तालुक्यातील मौजे खडकी ग्रामपंचायत अंतर्गत टोकेवाडी वस्ती येथील रहिवासी मधुकर कराड हे ऊसतोडणीसाठी कर्नाटक राज्यातील महात्मा गांधी सहकारी साखर कारखान्याला गेले होते. कारखान्यापासून काही अंतरावरचा ऊस तोडणीचा फड मिळाला होता. कारखान्यावरून सदरील दोन बैलगाड्या मागे पुढे घेऊन तिघे मायलेकरे ऊसतोडणीसाठी निघाले

ऊसतोड कामगार महिलेचा जागीच मृत्यू पती जखमी तर दोन बैलाला हि गंभीर मार, कारखाना प्रशासनाकडून मदतीचे तोंडी आश्वासन कर्नाटक राज्यातील गांधी कारखान्यावरील घटनाहोते. कारखान्यापासून अवघ्या पाचशे मीटर अंतरावर गेल्यानंतर समोरुन येणाऱ्या अज्ञात सुसाट ट्रकने जोराची धडक देऊन चालकाने ट्रकसह भरधाव वेगाने पुढे मार्गस्थ केली. या अपघातात समोरच्या बैलगाडी मध्ये

बसलेल्या ४८ वर्षीय महिला काशीबाई मधुकर कराड यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. तर पती मधुकर कराड जखमी झाले व बैलगाडीला जुंपलेले दोन बैल गंभीरित्या जखमी झाले आहेत. ही घटना काल सायं. ४.३० वाजण्याच्या सुमारास घडली आहे. तर या अपघातातील ट्रकने जोराची धडक देऊन भरधाव वेगाने पुढे मार्गस्थ झाल्याने ट्रकचा गाडी नंबर समजू शकलेला नाही. तर जवळच्याच शासकीय हॉस्पिटलमध्ये मृतदेहावर शवविच्छेदन करण्यात आले. तर आज सकाळी ९.३० वाजण्याच्या सुमारास टोकेवाडी येथे मयत महिलेवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# मोटार सायकल स्वारास लुटणारे सहा जण गजाआड

बीड । प्रतिनिधी

होळ-डिघोळआंबा रस्त्यावर सोन्याचा व्यवसाय असलेल्या मोटरसायकल स्वारास आडवून त्याच्याकडून सोन्याची पिशवी हिसकावून घेऊन जाणाऱ्या सहा जणांना पोलिसांनी गजाआड केले.



## पाच लाख ४० हजारांचा मुद्देमाल जप्त


दिनांक २१ फेब्रुवारी रोजी यातील फिर्यादी हा सोनार असुन तो सोने विक्री करण्यासाठी जुन्या डिघोळ अंबा रोडने मोटार सायकलवर बसुन जात असताना होळ ते डिघोळअंबा येथील दर्गाजवळ अज्ञात दोन मोटार सायकलवर चारजनांनी येवुन सोनाराची मोटार सायकल आडवुन त्याचे डोळयात तिखट चटणी टाकुन व त्यास चाकुचा धाक दाखवुन मारहाण करुन हातातील सोन्याची पिशवी जबरदस्तीने हिसकावुन घेवुन पळुन गेले होते वगैरे फिर्यादीवरुन पोलीस ठाणे युसुफ वडगांव येथे गु.र.नं ४६/२०२६ कलम ३०९ (६) बी.एन.एस प्रमाणे दिनांक २१.०२.२०२६ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता. अज्ञात आरोपीचा शोध पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखेचे पथक घेत होते परंतु आरोपीचा ठावठिकाणा लागत नव्हता.

वर नमुद गुन्हयाचा तपास स्थानिक गुन्हे शाखा करत असताना एकुण जवळपास ५० पेक्षा जास्त सिसिटिव्ही फुटेज तपासण्यात आले होते. सिसिटिव्ही फुटेज मधील संशयीत ईसमांची माहीती घेणे सुरु असताना दिनांक २६..०२.२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, सदर सिसिटिव्ही फुटेज मधील संशयीत ईसम नामे रोहीत रंजीत धिमधिमे हा असुन तो अंबाजोगाई बसस्थानक लगत राज मेडीकल जवळ उभा असल्याची माहीती मिळाल्यावरुन त्यास पथकाने ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने सदरचा गुन्हा हा सुदाम गणपत सोनवणे, रा डिघोळअंबा ता.धारुर व पोलीस अभिलेखावरील गुन्हेगार वीरसिंग रिसपालसिंग टाक, रा, अंबाजोगाई, यांचे सांगणेवरुन ◀◀ पान ३ वर

# योगेश्वरी देवस्थानला मुंबईतील भक्ताची १ कोटींची निनावी देणगी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री योगेश्वरी देवीच्या मंदिरासाठी मुंबईतील एका निनावी भक्ताने एक कोटी रुपयांची भरघोस देणगी दिली आहे. मंदिराच्या शंभर वर्षे जुन्या शिखराच्या जिर्णोद्धारासाठी ही मोठी रक्कम अर्पण करण्यात आली असून, देणगीदाराने आपली ओळख गुप्त ठेवण्याची अट घातली आहे. योगेश्वरी मंदिराचे मुख्य शिखर ऐतिहासिक असून ते पूर्णपणे चुन्याच्या बांधकामात असल्याने काळाच्या ओघात काहीसे कमकुवत झाले होते. या शिखराच्या



दुरुस्तीसाठी सुमारे ८० ते ९० लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याची माहिती मिळताच या भक्ताने तातडीने एक कोटी रुपयांचा धनादेश देवस्थान समितीकडे सुपूर्द केला. ही रक्कम बँकेत जमा झाली असून या आठवड्यापासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होत आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी तामिळनाडू येथील कुशल कारागिरांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्या पारंपारिक कौशल्यातून शिखरावरील सूक्ष्म नक्षीकाम पुन्हा एकदा दिमाखात साकारले जाईल. या निनावी दातृत्वामुळे अंबाजोगाई परिसरात आणि भाविकांमध्ये सध्या मोठे कुतूहल व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



## नाळवंडीत आश्रमशाळेत शालेय साहित्याचे वाटप

बीड । प्रतिनिधी

बीडच्या नगरसेविका डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त बीड तालुक्यातील नाळवंडी येथील आश्रमशाळेत शुक्रवारी शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी युवा नेते रोहित राऊत, ग्रामपंचायत सदस्य नामदेव म्हेत्रे, सतीश माळोदे, आकाश कानडे, रंगनाथ राऊत, नारायण राऊत, अमोल राऊत, शिक्षक अतुल काळे, खिल्लारे, सारिका होनराव, आरती म्हेत्रे, विद्यागर, देविदास वाघमारे यांच्यासह ग्रामस्थ, विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# जय भवानी महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा

**पाटोदा । प्रतिनिधी**

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या येथील कला आणि विज्ञान महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या निमित्ताने महाविद्यालयाच्या मराठी विभागाने आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून गढीच्या श्री. शिवाजीराव पंडित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.



विश्वास कदम हे उपस्थित होते.

मराठी भाषेतील महान कवी दिवंगत कुसुमाग्रज उर्फ वि. वा. शिरवाडकर यांच्या जयंतीच्या औचित्याने सर्वत्र मराठी भाषा गौरवदिन साजरा केला जातो. या अनुषंगाने कार्यक्रमाच्या प्रारंभी कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानिमित्ताने मराठी ◀◀ पान ३ वर

# फळरोपे वाटिकेतील मजुरांची प्रलंबित मजूरी द्या अन्यथा उपोषण-थोरात

माजलगाव । प्रतिनिधी

येथील कृषि चिकीत्सालय फळरोप वाटिका येथील प्रक्षेत्रावर



काम करणा-या मजुरांची दि. १४ ऑगस्ट २०२२ ते १५ फेब्रुवारी २०२३ या कालावधतील मजुरी थकीत असुन ही मजुरी देण्यात यावी अन्यथा कृषी आयुक्तालय कार्यालय पुणे येथे दि. ११ मार्च २०२६ पासुन अमरण उपोषण करण्याचा इशारा मजुर प्रतिनिधी गणेश थोरात यांनी निवेदनाव्दारे दिला आहे.

निवेदनावर बाबासाहेब पवार, तुकाराम निसर्गंध, महानंदा नवले, संजिवनी तंबुड, कमल भोपे, लोचना ढवळे, कुशिवर्ता मोरे, जिजाबाई सावंत, प्रयागा भोपे, उषा भोपे व मजुर प्रतिनिधी गणेश थोरात यांच्या स्वाक्ष-या आहेत.

# शासन निर्णय पायदळी? राष्ट्रीय मौखिक आरोग्य विभाग प्रभारीवर

## आधीच दोन डॉक्टर प्रतिनियुक्तीवर तरीही तिसरी नियुक्ती का? अजय सरवदे

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय मौखिक आरोग्य कार्यक्रम अंतर्गत ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार दंत आरोग्य सेवा मिळाव्यात, या उद्देशाने शासनाने स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे व शासन निर्णय जारी केलेले असताना, बीड जिल्ह्यात मात्र थेट शासन निर्णय कचऱ्याच्या पेटीत फेकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

आष्टी येथील ग्रामीण रुग्णालयात छजक्ष अंतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या महिला डॉक्टर यांची, केवळ ये-जा करण्यास अडचण होत असल्याच्या कारणावरून थेट नेकनूर स्त्री रुग्णालय (ता. बीड) येथे डेपोटेशनवर बदली करण्यात आली असल्याची गंभीर तक्रार वंचित बहुजन आघाडी, बीड जिल्ह्याच्या वतीने करण्यात आली आहे.

या प्रकरणात जिल्हा आरोग्य अधिकारी गंडाळ, जिल्हा शल्यचिकित्सक साळुंखे व मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान यांनी शासन निर्णयातील नियम व अटींचे उघड उल्लंघन केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

नेकनूर ग्रामीण स्त्री रुग्णालयात यापूर्वीच दोन डॉक्टर डेपोटेशनवर कार्यरत असताना, पुन्हा एका महिला डॉक्टरची नियुक्ती करण्यात आल्याने संशयाचे ढग दाटले आहेत. या मागे नेमके गोड बंगाल काय? असा सवाल उपस्थित करत, संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील रुग्णांना सेवा मिळावी म्हणून नियुक्त केलेल्या डॉक्टरांना शहराजवळील ठिकाणी आणणे हे केवळ प्रशासनाच्या सोयीसाठी आहे का? असा प्रश्नही उपस्थित होत आहे. वंचित बहुजन आघाडी, बीड जिल्ह्याच्या वतीने जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी मागण्या केल्या आहेत संबंधित तीनही डॉक्टरांचे डेपोटेशन तात्काळ रद्द करावे. डेपोटेशन आदेश काढणाऱ्या प्रत्येक अधिकारी-कर्मचाऱ्यावर शासन निर्णयाचे उल्लंघन केल्याबद्दल निलंबनाची कारवाई करावी. मागण्या मान्य न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन व उपोषण छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. ग्रामीण आरोग्य सेवा मजबूत करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनेचा असा गैरवापर होत असेल, तर हा केवळ प्रशासनाचा हलगर्जीपणा नसून शासन निर्णयाचा उघड अवमान आहे, असा संताप व्यक्त केला जात आहे.आता जिल्हाधिकारी आणि आरोग्य प्रशासन यावर काय भूमिका घेतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# पोलीस पाटील भरतीतील उमेदवारांनी आमिषांना बळी पडू नये-वसीमा शेख

पाटोदा । प्रतिनिधी

पोलीस पाटील पदभरतीच्या मुलाखती दि. ०१/०३/२०२६ ते दि. ०८/०३/२०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत. मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी यापूर्वीच जाहीर करण्यात आली आहे.

दरम्यान,मुलाखतीमध्ये जास्त गुण मिळवून देण्याच्या नावाखाली काही व्यक्तींमार्फत विविध प्रकारची आमिषे दाखवली जात असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त होत आहेत. या पार्श्वभूमीवर उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या वतीने सर्व उमेदवारांना अधिकृत आवाहन करण्यात आले आहे.

उपविभागीय अधिकारी वसीमा शेख मॅडम यांनी स्पष्ट केले आहे की, मुलाखतीचे गुणदान कोणत्या पद्धतीने व कोणत्या निकषांवर केले जाणार आहे, याची सविस्तर माहिती यापूर्वीच अधिकृत संकेतस्थळावर (Beed.gov.in) प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. गुणदान प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने व निर्धारित निकषांनुसारच होणार असून कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप ◀◀ पान ३ वर

# अथर्व नागरगोजे देशातून १६८ वा तर तनिष्का बडे व राजवीर घुगे यांचेही सुयश

वडवणी । प्रतिनिधी

ऑल इंडिया सैनिक स्कूल प्रवेश परिक्षा ही जानेवारी २०२६ मध्ये पार पडली. या परिक्षेत वडवणी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोन्नाखोटा शाळेचा विद्यार्थी चि.अथर्व बंडू नागरगोजे याने ३०० गुणांपैकी तब्बल २८४ गुण मिळवले. तर कु.तनिष्का उध्दव बडे हिने २५९ गुण मिळविले तर याच शाळेचा विद्यार्थी चि.राजवीर बाळासाहेब घुगे याने २६८ गुण मिळवून ते प्रवेशास पात्र झाले आहेत.

ऑल इंडिया सैनिक स्कूल प्रवेश परिक्षा ही जानेवारी २०२६ मध्ये पार पडली होती. या परिक्षेत वडवणी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोन्नाखोटा शाळेचा विद्यार्थी चि.अथर्व बंडू नागरगोजे याने ३०० गुणांपैकी तब्बल २८४ गुण मिळवले. तर कु.तनिष्का उध्दव बडे हिने २५९ गुण मिळविले



तर याच शाळेचा विद्यार्थी चि.राजवीर बाळासाहेब घुगे याने २६८ गुण मिळवून ते प्रवेशास पात्र झाले आहेत. इयत्ता सहावी प्रवेशासाठी ही परिक्षा आयोजित करण्यात आलेली होती. अतिशय अवघड प्रश्नांचा या परीक्षेत समावेश असतो. संपूर्ण पेपरची काठिन्यपातळी अधिक असते तसेच ग्रुपिंग मध्येही या परिक्षेत किमान गुण घेणारे विद्यार्थीच प्रवेशासाठी पात्र ठरतात. हा निकाल जाहीर झाल्यानंतर आता विद्यालय स्तरावर मौखिक परिक्षा आयोजित केली जाते आणि प्रवेशासाठीची गुणवत्ता यादी प्रसिध्द केली जाते व त्यानंतर गुणवत्तेनुसार अंतिम प्रवेश निश्चित केला जातो. या परिक्षेसाठी प्रत्येक वर्षी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये मोठी स्पर्धा होतांना दिसून येत आहे. परिक्षेतील या यशाबध्दल सर्व विद्यार्थ्यांचे वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे, कार्यतत्पर गटशिक्षणाधिरी बाबासाहेब उजगरे, चिंचवण केंद्राचे केंद्रप्रमुख सुनिल मुंडे तसेच शाळेचे मुख्याध्यापक आश्रुबा मुंडे व सोन्नाखोटा शाळेतील सर्व शिक्षकवृंद, अध्यक्ष व सदस्य शाळा व्यवस्थापन समिती सोन्नाखोटा यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन पुढील भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# रमजान ईद निमित्त बशीरगंज येथे मिना बाजार भरविण्यात येऊ नये - पठाण

बीड । प्रतिनिधी

रमजानच्या पवित्र महिन्यात ईद निमित्त बशीरगंज येथे मिना बाजार भरविण्यात येऊ नये, तर छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण (मल्टीप्रपोज ग्राउंड) येथे भरविण्यात यावे, असे निवेदन समाजसेवक पठाण मुकरमजान यांनी जिल्हाधिकारी बीड व संबंधित प्रशासनाकडे दिले आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की, दरवर्षी बीड नगरपरिषद मार्फत निविदा काढून जाहीर लिलावाद्वारे मिना बाजार व ईद बाजार दिले जातात. मात्र, यंदा बशीरगंजमधील बाजारामुळे शहरातील मुख्य रस्ता दहा दिवस पूर्णपणे बंद होईल, ज्यामुळे सामान्य नागरिकांसह आणीबाणी सेवांना प्रचंड अडचण निर्माण येईल, बशीरगंज राजुरीवेस भागातील हा रस्ता बीड शहरातील जीवनरेखेसारखा आहे. पूर्व दिशेकडील ८० टक्के लोकसंख्येला या रस्त्यावरून प्रवास करावा लागतो. उत्तर व दक्षिण दिशेने ५०-५० टक्के लोक दोन चाकी व चार चाकी वाहनांनी याच मार्गाने जातात. या भागात बीड नगरपरिषद मुख्यालय, पोस्ट ऑफिस मुख्य कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती बँक, भारतीय स्टेट बँक मुख्य शाखा, बुदलपुरा बीड शहर पोलीस स्टेशन, ग्रामीण पोलीस ठाणे व अग्निशमन दल केंद्र यांसारख्या महत्त्वाच्या संस्था आहेत. मिना बाजार भरल्यास दुकानदार रस्त्याच्या दोन्ही बाजूला दुकाने लावतात, ज्यामुळे अग्निशमन दलाच्या पाण्याच्या टँकरला निघणेही अशक्य होते. विशेषतः चिकन व चायनीज हटगाड्यांवर ८ ते १० हटगाडे असतात, प्रत्येकाकडे २ ते ३ गॅस सिलेंडर तयार असतात. एखाद्या सिलेंडरचा स्फोट झाल्यास जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा धोक्याचा इशारा पठाण यांनी दिला आहे.ॲम्ब्युलन्स किंवा ऑटोने रुग्णांना घेऊन जाणेही कठीण होईल, ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# कुलसचिव पदाचा पेच वाढला! 'त्या' उमेदवाराची एनओसी रद्द; कुलगुरूंची आता सत्त्वपरीक्षा

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे विद्यापीठाच्या कुलसचिव निवडीचा मुद्दा गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असतानाच, शुक्रवारी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत याचे तीव्र पडसाद उमटले. या विषयावर बैठकीत चर्चा टाळण्यात आली असली, तरी बैठकीनंतर झालेल्या अनौपचारिक चर्चेत सदस्यांनी आपली स्पष्ट भूमिका मांडली.

विशेष म्हणजे ज्या उमेदवाराच्या निवडीसाठी हालचाली सुरू आहेत, त्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र संबंधित संस्थेने रद्द केल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे. त्यामुळे आता कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दैनिक 'प्रभात'ने गेल्या तीन दिवसांपासून कुलसचिव निवडीवरून कुलगुरूंची सत्त्वपरीक्षा या वृत्तमालिकेद्वारे या प्रकरणाचा पाठपुरावा केला होता.

या पार्श्वभूमीवर शुक्रवारी व्यवस्थापन



परिषदेची बैठक पार पडली. बैठकीतील अजेंड्यावरील विषय संपल्यानंतर कुलगुरूंनी सदस्यांना चहापानासाठी निमंत्रित केले. या वेळी कुलसचिव निवडीचा विषय चर्चेला आल्यावर सदस्यांमध्ये दोन गट पडल्याचे पाहायला मिळाले.

एका सदस्याने हा विषय मंत्र्यांच्या अखत्यारीतला असल्याचे सांगत संबंधित व्यक्तीचीच निवड करावी लागेल, याकडे लक्ष वेधले. दुसऱ्या गटाने या प्रकरणाशी आमचा संबंध नसल्याचे सांगत, विद्यापीठाची प्रतिमा मलिन होऊ देऊ नका, अशी आग्रही भूमिका घेतली. विद्यापीठ प्रशासन ज्या व्यक्तीची कुलसचिव म्हणून नियुक्ती करण्यास उत्सुक आहे, त्या व्यक्तीला त्यांच्या मूळ शैक्षणिक संस्थेने दिलेली एनओसी २६ फेब्रुवारी २०२६ रोजी मागे घेतली आहे. कायदेशीर तरतुदींनुसार एनओसी नसल्यास संबंधित व्यक्तीचा या पदासाठी विचार होऊ शकत नाही.

अशा स्थितीत कुलगुरू नियमांवर बोट ठेवून धाडसी निर्णय घेणार का, हेच आता पाहावे लागणार आहे. हा निर्णय आता कुलगुरूंच्या अधिकारात असून, त्यांनीच योग्य तो निर्णय घ्यावा, अशी भूमिका सदस्यांनी घेतली आहे.

जेकुलगुरूंचा बळी जाणार?

कुलसचिव म्हणून नियुक्ती होणाऱ्या उमेदवाराची एनओसी संस्थेने रद्द केली आहे, तसेच कुलसचिव निवडीसाठी नेमलेल्या समितीची वैधता संपली आहे. या दोन प्रमुख कारणांवरून कोणीही त्या व्यक्तींच्या नियुक्तीचे धाडस करणार नाही. या सर्व कायदेशीर बाजू विचारता घेता मंत्रालयावरून कितीही दबाब आला, तरी अशा पद्धतीने नियुक्ती करणे कायद्याच्या कचाट्यात सापडण्यासारखे आहे. कायदेशीर त्रुटींमुळे कुलगुरू ठोस भूमिका घ्यावीच लागणार आहे; अन्यथा या वादात कुलगुरूंचा बळी जाणार की काय, अशी भीतीही व्यवस्थापन परिषदेच्या वर्तुळातून व्यक्त होत आहे.

# मुळा-मुठा नदीपात्रात कचऱ्याला भीषण आग; विषारी धुरामुळे नागरिकांचा श्वास कोंडला

**पुणे । प्रतिनिधी**

लोणी काळभोर (ता. हवेली) परिसरातील मुळा-मुठा नदीच्या पात्रात अवैधरित्या स्थानिक पातळीवर टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याला शुक्रवारी सकाळी भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. या आगीमुळे परिसरात प्रचंड धुराचे लोट पसरले असून नागरिकांना श्वसनाचा त्रास होत आहे.



अग्निशमन दलाचे आग विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न उशिरापर्यंत सुरू होते. स्वच्छ भारत मोहिमेच्या पार्श्वभूमीवर देशभरात स्वच्छता आणि नदी संवर्धनासाठी प्रयत्न सुरू असताना, लोणी काळभोर येथे मात्र नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर कचरा टाकून तो जाळण्याचा प्रकार अनेकदा उघडकीस आल्याने प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

लोणी काळभोर आणि कदमवाकवस्ती या पुणे शहराला लागून असलेल्या मोठ्या लोकसंख्येच्या ग्रामपंचायती आहेत. तसेच सदर ग्रामपंचायती या पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर असल्यामुळे या भागामध्ये शहरीकरण वाढते आहे. सदर महामार्गावरील या ग्रामपंचायतींच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर हॉटेल इंडस्ट्री, मंगल कार्यालये इत्यादी आहेत. त्यामुळे सदर ग्रामपंचायतींच्या हद्दीत दररोज मोठ्या प्रमाणात ओला व सुका कचरा उत्पन्न होतो. परंतु सदर ठिकाणी कचरा संकलनासाठी जागा तसेच कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी तांत्रिक प्रकल्प आजमितीस उपलब्ध नाही.

त्यामुळे नाइलाजास्तव दररोज सुमारे ३० ते ३५ ट्रॉलींहून अधिक कचरा थेट नदीपात्रात आणून टाकला जातो. परिणामी नदीपात्रात आता कचऱ्याचे मोठे ढीग तयार झाले असून परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरत असल्याने नागरिकांच्या आरोग्याबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळे सदर ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे.

# भाजप व्यापारी आघाडीच्या अध्यक्षपदी महेश गुप्ता यांची नियुक्ती

**पुणे । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या पुणे शहर व्यापारी आघाडीच्या अध्यक्षपदी युवा, गतिमान आणि संघर्षशील नेतृत्व म्हणून ओळख असलेल्या महेश गुप्ता यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी त्यांना नियुक्तीचे पत्र दिले. प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे तसेच पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



महेश गुप्ता यांनी गेल्या अनेक वर्षांपासून व्यापारी वर्गाच्या प्रश्नांवर आक्रमक व परिणामकारक भूमिका घेतली आहे. शासन, महानगरपालिका, पोलीस प्रशासन तसेच विविध शासकीय विभागांमध्ये त्यांची ठोस उपस्थिती आणि प्रभावी समन्वय क्षमता ही त्यांची विशेष ओळख आहे. व्यापाऱ्यांवर होणाऱ्या अन्यायकारक कारवायांविरोधात त्यांनी सातत्याने आवाज उठवला असून, समस्यांचे केवळ निवेदन नव्हे तर प्रत्यक्ष निकाल लावण्याची कार्यपद्धती त्यांनी निर्माण केली आहे. भाजपा व्यापारी आघाडी ही केवळ संघटना नसून व्यापाऱ्यांच्या सन्मान, सुरक्षितता आणि हक्कांची लढाई लढणारे प्रभावी व्यासपीठ ठरेल, अशी स्पष्ट भूमिका महेश गुप्ता यांनी मांडली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पुणे शहरातील व्यापारी वर्ग अधिक संघटित, सशक्त आणि राजकीयदृष्ट्या प्रभावी होईल, असा ठाम विश्वास गुप्ता यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

# वाघोलीत २० वर्षीय तरुणीची इमारतीवरून उडी; उपचारादरम्यान मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

वाघोली परिसरातील मॅजेस्टिक ओयसिस या उंच इमारतीत राहणाऱ्या २० वर्षीय तरुणीने आठव्या मजल्यावरून उडी मारल्याची धक्कादायक घटना शनिवारी दुपारी घडली. या घटनेत ती गंभीर जखमी झाली होती. उपचारासाठी रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.



वाघोली पोलीस स्टेशन कडून मिळालेल्या माहितीनुसार, सारा अंधारे (२०) ही मॅजेस्टिक ओयसिस बिल्डिंगच्या 'ए' विंगमध्ये राहत होती. दुपारी सुमारे १२.४५ वाजण्याच्या सुमारास तिने आठव्या मजल्यावरील रिफ्युजी एरियामधून खाली उडी मारली. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने तिला तात्काळ लाईफ लाईन हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती तिला मृत घोषित केले. मिळालेल्या माहितीनुसार, सारा हिने करमाळा येथे इयत्ता अकरावीचा फॉर्म बाहेरून भरला होता. घटनेच्या वेळी तिची आई आणि बहीण घरी उपस्थित होत्या. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार गायकवाड यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप समजू शकले नसून, या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# कोर्टातच भिडल्या दोन महिला वकील; एकीच्या डोक्याला गंभीर दुखापत, गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

शिवाजीनगर येथील मोटार वाहन न्यायालय परिसरात दोन महिला वकिलांमध्ये झालेल्या वादातून हाणामारीची गंभीर घटना घडली आहे. या घटनेत एका वकिलाच्या डोक्याला टोकदार वस्तूने मार लागून रक्तस्राव झाल्याची माहिती समोर आली आहे. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. पोलिसांनी सांगितले की, तक्रारदार ड. (४२ रा. भवानी पेठ) या गेल्या दीड वर्षांपासून मोटार वाहन न्यायालय, शिवाजीनगर येथे वकिली व्यवसाय करीत आहेत. त्यांचा आरोप आहे की, न्यायालयीन प्रकरणे जास्त प्रमाणात मिळत असल्याच्या कारणावरून दोन महिला वकिलांशी त्यांचे यापूर्वी वाद झाले होते.

दरम्यान, २४ फेब्रुवारी रोजी सकाळी त्या न्यायालयात कामासाठी आल्या असता संबंधित दोन वकिलांनी त्यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. दिवसभर त्या त्यांच्या मागे फिरत आज कुणालाही काम करू देणार नाही, पैसे कमवू देणार नाही, अशी धमकी दिल्याचा आरोप आहे. यानंतर दुपारी सुमारे पुन्हा वाद वाढला. तक्रारदार न्यायालयाबाहेर पडत असताना एका आरोपीने पाठीवर बुक्की मारली. त्यानंतर दोघींमध्ये झटापट झाली. केस ओढणे, हातघाई अशी मारहाण झाली. त्यावेळी दुसऱ्या महिला वकिलानेही मारहाण केल्याचा आरोप आहे. झटापटीदरम्यान एका वकिल महिलेने टोकदार वस्तूने डोक्यावर वार केल्याने तक्रारदारांच्या डोक्याला जखम झाली व रक्तस्राव सुरू झाला. त्यांना चक्कर आल्याने सहकाऱ्यांनी आधार दिला. न्यायालयातील नर्सकडून प्रथमोपचार केल्यानंतर त्यांना रास्ता पेठ येथील धन्वंतरी हॉस्पिटल येथे उपचारासाठी नेण्यात आले. घटनेनंतर शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला

# पुण्यात पत्रकारितेच्या नावाखाली खंडणीचा धडाका! १० लाख द्या नाहीतर कंपनी बंद पाडू; न्यूज चॅनेलच्या संपादकावर गुन्हा

**पुणे । प्रतिनिधी**

इंद्रायणी ब्रँडने खाद्यतेल विक्री करणाऱ्या तरुण उद्योजकाला १० लाख रुपये द्या, नाहीतर कंपनीची बदनामी करून बंद पाडू अशी धमकी देत खंडणी मागितल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी एका न्यूज चॅनेलच्या संपादकासह दोघांविरुध्द खंडणीचा गुन्हा दाखल मांजरी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

मांजरी पोलिसांनी सांगितले की, फिर्यादी हर्षल संदीप धोक्रट (२४ रा. आंबेगाव बुद्रुक) हे फ्रीझल फुडस प्रा. लि. या कंपनीचे संचालक आहेत. त्यांच्या कंपनीमार्फत 'इंद्रायणी' या नावाने खाद्यतेलाचे पॅकेजिंग व विक्री केली जाते. कंपनीचे गोदाम हांडेवाडी रोड, उरळी देवाची येथे आहे. २५ फेब्रुवारी रोजी रात्री तीन व्यक्ती गोदामात आल्या. त्यापैकी एकाने स्वतःला पोलिस कॉन्स्टेबल ननवरे असे सांगितले, तर सोबत आलेल्यांनी स्वतःला पत्रकार असल्याचे सांगून कंपनीत व्हिडिओ शूटिंग सुरू केले. कंपनी अस्वच्छ असल्याचा आरोप करत त्यांनी मालकाला पोलीस ठाण्यात येण्यास सांगितले.यानंतर संबंधित पत्रकारांनी कंपनीची नकारात्मक बातमी पेपर, न्यूज चॅनल व सोशल मीडियावर प्रसारित करण्याची धमकी दिली. प्रकरण मिटवायचे असेल तर १० लाख रुपये द्या, अशी मागणी केल्याचा आरोप आहे कात्रज-कोंढवा रोडवरील कान्हा हॉटेलमध्ये झालेल्या भेटीत सागर हांगे व महाराष्ट्र न्यूज मराठी चॅनेलचे संपादक सागर गवळी यांनी मोबाईलवरील कॅलक्युलेटरमध्ये दहा लाख ही रक्कम दाखवून पैशांची मागणी केल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यानंतर वारंवार मोबाईल कॉल व व्हॉट्सप कॉल करून पैसे देण्याचा दबाव टाकण्यात आल्याचा दावा आहे. बातमी लागली तर कंपनीची बदनामी होईल, अशी धमकी देण्यात आल्याचे सांगितले आहे.या प्रकारामुळे घाबरलेल्या व्यावसायिकाने अखेर पोलिसांकडे तक्रार दाखल केली. प्रकरणाचा तपास फुरसुंगी पोलीस स्टेशन कडून सुरू आहे. संबंधित मोबाईल क्रमांकावरील कॉल रेकॉर्डिंग व सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली जात आहे.

# ट्रकच्या धडकेत ३ वर्षीय चिमुरड्याचा जागीच अंत

**पुणे । प्रतिनिधी**

कात्रज परिसरातील 'डेथ ट्रॅप' ठरणाऱ्या रस्त्यांवर अपघातांचे सत्र सुरूच असून, शनिवारी सकाळी एका निष्पाप चिमुरड्याला आपला जीव गमवावा लागला. वंडर सिटीसमोर भरधाव ट्रकने दुचाकीला दिलेल्या धडकेत ३ वर्षांच्या मुलाचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये संताप आणि हळहळ व्यक्त होत आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी सकाळी ९:०० च्या सुमारास अंश भाऊरंग कांबळे (वय ३ वर्ष, रा. अंजनी नगर, कात्रज) हा आपल्या वडिलांसोबत दुचाकीवरून (क्रमांक चक१२ ढए २९३७) जात होता. कात्रजकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर वंडर सिटीसमोर पाठीमागून येणाऱ्या ट्रकने (क्रमांक चक१९ उध ९५७२) त्यांच्या दुचाकीला जोरात धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, अंश ट्रकच्या चाकाखाली आला आणि त्याच्या डोक्यावरून चाक गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. याप्रकरणी ट्रक चालक इंद्रजित बाबुराव जानते (वय ५०, रा. निलंगा, लातूर) याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्याच्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. कात्रज परिसरात अपघातांचे प्रमाण भयावह पद्धतीने वाढले आहे. या मार्गावर चोवीस तास अवजड वाहनांची वर्दळ असते, ज्यावर प्रशासनाचे नियंत्रण सुटल्याचे दिसते. तसेच रस्त्यावरील निसरडेपणामुळे दुचाकीस्वारांचे नियंत्रण सुटून अपघात होण्याचे प्रमाण मोठे आहे. अवघ्या आठ दिवसांपूर्वी कात्रज डेअरीसमोर झालेल्या अपघातात एका तरुणीचा मृत्यू झाला होता. ती घटना ताजी असतानाच आज पुन्हा एका चिमुरड्याचा बळी गेला आहे.

दरम्यान, याप्रकरणी आता प्रशासन अजून किती बळींची वाट पाहत आहे? असा संतप्त सवाल स्थानिक नागरिकांनी उपस्थित केला आहे. या ठिकाणी तातडीने उपाययोजना आणि वाहतुकीचे नियोजन करण्याची मागणी जोर धरत आहे

# पुण्यात बनावट अलब्युरेल औषधाचा मोठा भांडाफोड; अनेक वितरक-पुरवठादारांवर गुन्हा

**पुणे । प्रतिनिधी**

अन्न व औषध प्रशासनाच्या तपासात अलब्युरेल नावाचे औषध बनावट बाजारात विक्री होत असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी पुणे, मुंबई, नागपूर आणि रायगड येथील पाच ठोक विक्रेत्यांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या या रॅकेटचा उलगडा औषध निरीक्षक श्रुतिका जाधव यांच्या फिर्यादीवरून झाला आहे. पोलिसांनी सांगितले की, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्याच्या पुणे विभागात कार्यरत असलेल्या औषध निरीक्षक श्रुतिका जाधव यांनी २८ जुलै २०२५ रोजी सदाशिव पेठ येथील मे. मैत्री फार्मास्युटीकल्स येथे तपासणी केली.

तेथून अलब्युरेल व रिच्यूएक्सरेल या औषधांचे नमुने घेऊन ते शासकीय विश्लेषक, मुंबई यांच्याकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले. शासकीय विश्लेषकांच्या अहवालानुसार अलब्युरेल हे औषध या. पी. चाचणीमध्ये अपयशी ठरले असून ते औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० च्या कलम १७ (ब) अन्वये बनावट घोषित करण्यात आले आहे. तपासादरम्यान या बनावट औषधाची खरेदी-विक्री साखळीत मे. मैत्री फार्मास्युटीकल्स (सदाशिव पेठ, पुणे), मे. श्री साई लॉजिस्टिक (नागपूर), एम/एस नेक्सस लाईफकेअर प्रा. ली. (दादर (पूर्व), मुंबई), एन आर एक्स डिस्ट्रीब्युटर्स एलएलपी (सायन, मुंबई), एम/एस आरआरटी फार्मा (कामोठे, रायगड) या सर्वांनी संगनमत करून बनावट औषधांची खरेदी-विक्री केल्याचा आरोप आहे.

# मी माझ्या बायकोचा मर्डर केलाय, या.. पोलिसांना सकाळी ८ वाजता आला खळबळजनक फोन

**पुणे । प्रतिनिधी**

घरगुती वाद, नैराश्य आणि आर्थिक ताणतणावाच्या गुंत्यात अडकलेल्या एका कुटुंबाची कहाणी मंगळवारी पहाटे भीषण शेवटाकडे गेली. खडकी परिसरातील ओरियन कॉम्प्लेक्समध्ये पतीनेच झोपलेल्या पत्नीचे तोंड व नाक ब्लँकेटने दाबून खून केला. त्यानंतर स्वतःच पोलिसांना फोन करून मी माझ्या बायकोचा मर्डर केला आहे, अशी कबुली दिली.

पोलिसांनी सांगितले, की सकाळी सुमारे ८ वाजता नियंत्रण कक्षाकडून संदेश प्राप्त झाला. कॉलरने स्वतः घटनास्थळी उपस्थित असल्याचे सांगत पत्नीचा खून केल्याची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी मौजे चिखलवाडीतील ओरियन कॉम्प्लेक्स येथे धाव घेतली. दरवाजा उघडणाऱ्या व्यक्तीने मीच दिलीप नंबुरी कंडाथीलमी माझ्या बायकोचा मर्डर केला आहे, असे शांतपणे सांगितले. पोलिसांना बेडरूममध्ये नेऊन त्याने पत्नी बिंदू (५३) यांचा मृतदेह दाखवला. प्राथमिक चौकशीत आरोपी दिलीप नंबुरी कंडाथील (५६) याने सोमवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास पत्नी झोपेत असताना तिच्या चेहऱ्यावर ब्लँकेट टाकून नाक व तोंड दाबले व गुदमरल्याने तिचा मृत्यू झाल्याचे त्याने सांगितले.

आरोपीच्या म्हणण्यानुसार, पत्नी दीर्घकाळ नैराश्याच्या उपचाराखाली होती. ती पतीवर पहिल्या घटस्फोटित पत्नीस भेटत असल्याचा संशय घेत असे आणि त्यातून वारंवार वाद होत. त्यातच व्यवसायात नुकसान होऊन कर्जबाजारी झाल्यामुळे तो मानसिकदृष्ट्या खचला होता. रोजच्या भांडणाला कंटाळून हे पाऊल उचलल्याची कबुली त्याने दिली.

# गॅलरीतून उडी मारलेल्या 'त्या' महिलेचा मृत्यू; आता सीआयडी करणार तपास

**पुणे । प्रतिनिधी**

स्पा सेंटरवरील पोलीस छाप्यावेळी गॅलरीतून उडी मारलेल्या महिलेचा ससूनमध्ये उपचारावेळी मृत्यू झाल्याने राज्य गुन्हे अन्वेषण (सीआयडी) पथकाने घटनास्थळी भेट देऊन माहिती घेतली. स्पा सेंटरच्या नावे सुरू इमारतीत वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती मिळाल्यावर विमानतळ पोलिसांनी सोमवारी (दि.२३) छापा टाकला होता.

सीआयडी पथकाने मंगळवारी घटनास्थळी भेट देऊन माहिती घेतली. दरम्यान, मृत्यू झालेल्या महिलेच्या पतीने पोलीस आयुक्तांकडे तक्रार केली असून, चौकशीची मागणी केली आहे. तक्रार अर्जात त्याने म्हटले आहे, की घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज जप्त करून त्याची फॉरेन्सिक तपासणी करावी. घटनास्थळी उपस्थित अधिकारी, पोलीस, व्यक्तींचे जबाब नोंदवावेत. छाप्यावेळी महिलेबरोबर स्पा मॅनेजर हुसेन शेख यानेगी उडी मारल्याने तो जखमी झाला आहे. ही घटना विमानतळ परिसरातील सिटी स्पेस बिल्डिंगच्या पहिल्या मजल्यावरील द रुटस स्पा येथे सोमवारी दुपारी साडेतीन वाजता घडली होती. वेश्या व्यवसायाची माहिती मिळाल्यावर पोलिसांनी बनावट ग्राहक पाठवून खातरजमा केली.त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोविंद जाधव, महिला अंमलदार, पंचांसमक्ष वर कारवाई करण्यासाठी सिटी स्पेसमध्ये दाखल झाले. स्पाचा दरवाजा उघडण्यासाठी आवाज दिल्यानंतर दरवाजा उघडला नाही. त्यामुळे पोलिसांनी काचेचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला असता, तेथे चार पीडित महिला, चार पुरुष आढळले. यावेळी एका केबिनचा दरवाजा बंद दिसला. हाही दरवाजा उघडला नाही तेव्हा पोलिसांनी दरवाजा तोडून आत प्रवेश केला. यावेळी आतील महिलेने दोघेजण गॅलरीमार्गे खाली उतरत असल्याची माहिती दिली. पोलिसांनी पाहिले तेव्हा, दोघेजण खाली पडल्याचे दिसून आले. त्यात एक महिला, एक पुरुष होता. पोलिसांनी त्यांना सरकारी गाडीतून खासगी रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर दोघांना ससूनमध्ये दाखल केले. मात्र, महिलेच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने तिचा मृत्यू झाल्याचे पोलिसांनी सांगितले.